# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६३ वे अंक ८४) पोस्टाचा परवाना नं. / अे / आर / ए.जी.डी. - ०७ / २०२३ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार, दि.२० मार्च २०२४ (पाने ४) (किंमत २ रुपये)


## लाजिरवाणा विक्रम: सर्वाधिक प्रदूषित देशांमध्ये भारत जगात तिसऱ्या स्थानावर; पहिल्या ५० पैकी ४२ शहरं भारतातील

नवी दिल्ली दि.१९ (वृत्तसंस्था)- जागतिक महासत्ता होण्याच्या दिशेनं वाटचाल करणाऱ्या भारताच्या नावावर एक लाजिरवाणा विक्रम झाल्याचं नुकतंच एका सर्वेक्षणाच्या अहवालावरून समोर आलं आहे. स्वीस एअर मॉनिटरिंग बॉडी नं हा सर्वे केला असून त्यानुसार बांगलादेश आणि पाकिस्तानच्या पाठोपाठ भारत हा जगभरातील तिसरा सर्वाधिक प्रदूषित देश ठरला आहे. 'वर्ल्ड एअर क्वॉलिटी रिपोर्ट २०२३' च्या निष्कर्षांनुसार १३४ देशांच्या यादीत भारताचा प्रदूषित हवेच्या निकषांवर तिसरा क्रमांक लागतो. त्याशिवाय जगभरातील सर्वाधिक प्रदूषित ५० शहरांमध्ये एकट्या भारतातील ४२ शहरांचा समावेश आहे. जगभरातील विविध देशांमधल्या हवेचा दर्जा तपासण्यासाठी पीएम २.५ चं प्रमाण हे मापक वापरण्यात आलं होतं. त्यानुसार भारतात प्रत्येक क्युबिक मीटर क्षेत्रात ५४.४ माक्रोग्रॅम पीएम २.५ चं केंद्रीकरण झाल्याचं निदर्शनास आलं. बांगलादेशमध्ये हे प्रमाण सर्वाधिक म्हणजेच ७९.९ मायक्रोग्रॅम प्रतीक्युबिक मीटर तर त्यापाठोपाठ पाकिस्तानमध्ये हे प्रमाण ७३.७ मायक्रोग्रॅम प्रतीक्युबिक मीटर इतकं आढळून आलं. बेगुसराय, गुवाहाटी आणि दिल्लीव्यतिरिक्त ग्रेटर नोएडा (११), मुझफ्फरनगर (१६), गुरगाव (१७), अराह (१८), दादरी (१९), पाटणा (२०), फरिदाबाद (२५), नोएडा (२६), मीरत (२८), गाझियाबाद (३५) आणि रोहतक (४७) या शहरांचा या यादीत समावेश आहे.

## सीएएला स्थगिती देण्यास सर्वोच्च न्यायालयाचा नकार

नवी दिल्ली दि.१९ (वृत्तसंस्था)- संसदेने मंजुरी दिल्यानंतर तब्बल पाच वर्षांनी वादग्रस्त नागरिकत्व दुरुस्ती कायदा (सीएए) केंद्र सरकारने गेल्या सोमवारी (११ मार्च) लागू केला. त्यासंदर्भातील अधिसूचनादेखील काढण्यात आली आहे. सरकारने राजकीय फायद्यासाठी लोकसभा निवडणुकीच्या महिनाभर आधी हा निर्णय घेतल्याची टीका होत आहे. तसेच या कायद्याला विरोध करणाऱ्या याचिकादेखील सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आल्या आहेत. अशा २३७ याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात आज (१९ मार्च) सुनावणी घेण्यात आली. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यतेखालील तीन सदस्यीय खंडपीठाने या याचिकांवर सुनावणी घेतली. दरम्यान, आजच्या सुनावणीवेळी न्यायमूर्तींनी सीएएवर कोणत्याही प्रकारची स्थगिती देण्यास नकार दिला. तसेच न्यायालयाने केंद्र सरकारला पुढील तीन आठवड्यांच्या आत उत्तर देण्याचे आदेश दिले आहेत. या कायद्याला विरोध करणाऱ्या याचिकांमध्ये मांडलेल्या मुद्यांवर आणि प्रश्नांवर केंद्र सरकारला उत्तर देण्यास सांगितलं आहे.

सुनावणीवेळी सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी केंद्र सरकारच्या प्रतिनिधिंना प्रश्न विचारला की, अधिसूचनेवर स्थगिती देण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर उत्तर देण्यासाठी तुम्हाला किती वेळ लागेल? यावेळी केंद्र सरकारच्या वतीने न्यायालयात हजर असलेले महाधिवक्ते म्हणाले, आम्हाला किमान चार आठवडे लागतील. त्यावर न्यायालयाने केंद्र सरकारला तीन आठवड्यांची मुदत दिली. तसेच या प्रकरणाची पुढील सुनावणी ९ एप्रिल रोजी होईल, असं सांगितलं.

याचिकाकर्त्यांपैकी एकाचे वकील कपिल सिब्बल यांनी केंद्र सरकारला तीन आठवड्यांची (पान ४ वर)

## मनसे-भाजप युती होण्याची दाट शक्यता?

### राज ठाकरेंची अमित शाहांसोबत दिल्लीत खलबतं

नवी दिल्ली दि.१९ (वृत्तसंस्था)- राज्याच्या महायुतीमध्ये आता मनसेचा समावेश होणार हे निश्चित झालं असून राज ठाकरे यांनी दिल्लीमध्ये केंद्रीय मंत्री अमित शाह यांची भेट घेतली. या भेटीमध्ये लोकसभेच्या जागावाटपावर चर्चा झाल्याची माहिती आहे. लोकसभेच्या निवडणुकीमध्ये मनसेला एक किंवा दोन जागा मिळू शकतात असं सांगितलं जातंय. तसेच मनसेचा महायुतीमध्ये समावेश झाल्याची घोषणाही केली जाण्याची शक्यता आहे.

राज ठाकरेंच्या म्हणण्यानुसार त्यांना बोलवलं आहे म्हणून ते दिल्लीत गेले आहेत. आता अमित शाह यांनी जर त्यांना बोलवलं असेल तर ही गोष्ट महाराष्ट्राच्या राजकारणात नक्कीच महत्त्वाची मानली पाहिजे. कारण राज ठाकरे हे जर महायुतीत सहभागी झाले तर 'ठाकरे ब्रांड' पुन्हा एकदा महायुतीबरोबर येईल. उद्धव ठाकरे काँग्रेस आणि राष्ट्रवादीबरोबर गेले आहेत. त्यामुळे महायुतीत मोकळी झालेली ठाकरेंची स्पेस भरुन काढण्यात राज ठाकरे यशस्वी होऊ शकतात. कारण राज ठाकरेंकडे लोकांना आपलंसं करण्याचा, आपलं म्हणणं भाषणांतून मांडण्याचा करीश्मा आहे. अमित शाह आणि राज ठाकरे यांच्यातली ही भेट या नव्या बदलांचं द्योतक आहे यात काहीही शंका नाही. राज ठाकरे हे जर महायुतीत आहे तर निश्चितच ती त्यांच्यासाठी आणि एका अर्थाने भाजपासाठीही नव्या पर्वाची सुरुवात ठरेल.



राज ठाकरे हे सोमवारी संध्याकाळी दिल्लीमध्ये पोहोचले. त्यानंतर मंगळवारी भाजप आणि मनसेमध्ये लोकसभेच्या जागावाटपावरून चर्चा पार पडली. दक्षिण मुंबईची जागा ही राज ठाकरेंना सोडण्याचा निर्णय भाजपने घेतला असल्याची माहिती समोर येत आहे. या ठिकाणाहून मनसेचे बाळा नांदगावकर किंवा अमित ठाकरे निवडणूक लढवण्याची शक्यता वर्तवण्यात येतेय.

शिवसेना फुटून दोन गट पडले तरी मुंबईत आणि राज्यभरात उद्धव ठाकरेंना असलेली सहानुभूती कमी झाल्याचं दिसत नाही. भाजपच्या आतापर्यंतच्या अहवालात तेच नमूद करण्यात आलं आहे. त्यामुळेच उद्धव ठाकरेंना आव्हान देण्यासाठी ठाकरे ब्रँडच उपयोगी येईल असा कयास भाजपचा आहे. त्याचाच एक भाग म्हणून भाजपने मनसेसोबत चर्चा केली असून त्यांनाही लोकसभेच्या काही जागा देण्यात येणार आहेत.

## लोकशाहीवर विश्वास नसलेल्या शक्तींमुळे देशाला हुकूमशाहीचा धोका, सुशीलकुमार शिंदेंचा इशारा

सोलापूर दि.१९ (प्रतिनिधी)- आपला भारत देश गांधी-नेहरूंच्या लोकशाहीवर निष्ठा ठेवणारा आहे. परंतु लोकशाहीवरचा विश्वास नसलेली शक्ती सत्तेवर आल्यामुळे लोकशाही धोक्यात आली आहे. पुढील काळात हुकूमशहांचे वर्चस्व निर्माण होऊन भारताची परिस्थिती रशियासारखी होईल. म्हणून यंदाची लोकसभा निवडणूक अधिक सजग राहून लढावी लागणार आहे, असे मत काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे यांनी व्यक्त केले. सोलापूर राखीव लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मोहोळ येथे आयोजित सभेत शिंदे बोलत होते. यावेळी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर परखड शब्दांत टीका



केली. नरेंद्र मोदी पूर्वी गुजरातचे मुख्यमंत्री होते, तेव्हा ते बरे होते. परंतु नंतर पंतप्रधान झाल्यानंतर गेल्या दहा वर्षांत त्यांच्यात निव्वळ खोटारडेपणा जाणवतो, दहा वर्षांत त्यांनी भूलभुलैया करून केवळ खोटे बोलून जनतेला फसविले. खोटे बोलायला मर्यादा असते. ही मर्यादाच मोदी यांनी तोडली आहे, असा आरोप शिंदे यांनी केला. मोदींची गॅरंटी म्हणजे पुन्हा जनतेला फसविण्याची जुमलेबाजी आहे, अशी टीका त्यांनी केली.

## मोदीसारखी आमची जुमलेबाजी व फेकूगिरी नाही, बानवकुळे हेच मुळात सिनेमातील विनोदी पात्र; नाना पटोले यांची सडकून टीका

मुंबई दि.१९ (प्रतिनिधी)- शिवाजी पार्कवरील भारत जोडो न्याय यात्रेच्या समारोपाच्या ऐतिहासीक सभेने एक नवा इतिहास रचला आहे. इंडिया आघाडीच्या देशभरातील नेत्यांच्या उपस्थितीत या सभेला 'जनसागर' लोटला होता. शिवाजी पार्कवरील सभेने भाजपाला आपला पराभव समोर दिसू लागला आहे त्यामुळे नैराश्येतून चंद्रशेखर बावनकुळे, प्रवीण दरेकर यांच्यासह मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री उदय सामंत सारख्यांना धडकी भरली आहे. शिवाजी पार्कवरील सभेने 'मोदानी' सरकारच्या अंताची सुरुवात झाल्याने, त्यांची झोप उडाली आहे, असे सडेतोड प्रत्युत्तर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी दिले आहे.

शिवाजी पार्कवरील सभा व राहुल गांधी यांच्यावर टीका करणाऱ्यांचा खरपूस समाचार घेत नाना पटोले पुढे म्हणाले की, नरेंद्र मोदी सर्वात मोठे खंडणी वसुलीचे रॅकेट चालवतात या राहुल गांधी यांच्या प्रश्नाला उत्तर देण्याची धमक आधी भाजपाने दाखवावी. शिवाजी पार्कवरील सभेने देशात परिवर्तनाचा संकेत दिला आहे हे स्पष्ट असून पराभवाच्या भितीपोटी भाजपा व गद्दारसेनेचे लाचार या सभेवर अनावश्यक टीका करत आहेत. उद्धव ठाकरेंनी काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसबरोबर सरकार स्थापन केल्यापासून भाजपाला पोटशूळ उठला आहे. 'हिंदुत्व खतरे में' अशी कोल्हेकुई भाजपाचे नेते करत असतात व त्यांच्याच सुरात सुर मिसळून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे री ओढत असतात. भाजपाने देशभरातील विविध राज्यात राजकीय तडजोडी केल्या, काश्मीरमध्ये मेहबुबा मुफ्ती यांच्या पक्षासोबत सरकार स्थापन करून भाजपाने दीड दोन वर्ष संसार केला तेंव्हा यांचे 'हिंदुत्व खतरे में' आले नाही का? बाळासाहेबांचा एखादा व्हिडिओ दाखवून ते काँग्रेस विरोधी होते हे दाखवण्याचा केविलवाणा प्रयत्न करत आहेत. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे व काँग्रेसच संबंध लपून राहिलेले नाहीत. बाळासाहेबांनीच (पान ४ वर)

## महायुतीत एकवाक्यता, एकही खासदार नाराज नाही; शिवसेना खासदार राहुल शेवाळेंची स्पष्टोक्ती

मुंबई दि.१९ (प्रतिनिधी)- महायुतीत समाधानकारक जागा मिळत नसल्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेचे अनेक खासदार नाराज असल्याची चर्चा आहे. पण शिंदे यांचे निकटवर्तीय खासदार राहुल शेवाळे यांनी ही चर्चा धुडकावून लावली आहे. लोकसभा निवडणुकीसाठी पक्षाच्या उमेदवारांच्या नावांची घोषणा पुढील १-२ दिवसांत केली जाईल. तूर्त शिवसेनेतील एकही खासदार नाराज नाही, असे ते म्हणालेत.

महायुतीच्या जागावाटपाचे गुऱ्हाळ गत अनेक दिवसांपासून सुरू आहे. मध्यंतरी भाजपने आपल्या २० उमेदवारांच्या नावांची घोषणा केली. पण काही जागांवरील तिढा अद्याप कायम असल्यामुळे शिवसेना (शिंदे) व राष्ट्रवादी काँग्रेसला (अजित पवार) अद्याप आपल्या उमेदवारांच्या नावांची घोषणा करता आली नाही. त्यातच जागावाटपात आपला पत्ता कट होण्याच्या भीतीने खासदारांना ग्रासले आहे. त्यामुळे शिवसेना खासदार राहुल शेवाळे, कृपाल तुमाने, भावना गवळी, धैर्यशील माने, श्रीरंग बारणे, सदाशिव लोखंडे, हेमंत गोडसे आदी खासदारांनी मंगळवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची त्यांच्या ठाणे येथील निवासस्थानी भेट घेतली.

## अजित पवार विरुद्ध शरद पवार याचिकेत दोघांना दिलासा

### निकाल लागेपर्यंत दोन्ही गटाचे निवडणूक चिन्ह कायम ठेवण्याचे आदेश

मुंबई दि.१९ (प्रतिनिधी)- सर्वोच्च न्यायालयाने शरद पवार विरुद्ध अजित पवार यांच्या याचिकेवर दोन्ही गटाला दिलासा देत महत्त्वाचा निर्णय दिला आहे. निवडणूक आयोगाने शरद पवार यांच्या गटाला दिलेले तुतारी वाजवणारा माणूस हे चिन्ह लोकसभा आणि नंतर विधानसभा निवडणुकीपर्यंत कायम ठेवण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. तर अजित पवार यांच्याकडे असलेलले घड्याळ हे निवडणूक चिन्ह या प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत कायम राहणार आहे. त्यामुळे आता अजित पवार आणि शरद पवार या दोन्ही गटाला सर्वोच्च न्यायालयाकडून दिलासा मिळाला असल्याचे बोलले जात आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर अजित पवार गटाला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नाव आणि घड्याळ हे निवडणूक चिन्ह निवडणूक आयोगाच्या वतीने देण्यात आले आहे. निवडणूक आयोगाच्या या निर्णयाविरोधात शरद पवार गटाने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. आज या प्रकरणाची सुनावणी झाली. मागील वेळी म्हणजेच १४ मार्च रोजी झालेल्या सुनावणीत शरद पवार यांचा फोटो वापरण्यावरून सर्वोच्च न्यायालयाने अजित पवार गटाला फटकारले होते. तसेच असे अशा पद्धतीने शरद पवार यांचा फोटो वापरणार नाही, असे शपथपत्र देण्याचे आदेश देखील दिले होते. या सर्व प्रकरणामुळे आज सर्वोच्च न्यायालय काय निर्देश देते, याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने दोन्ही गटाला दिलासा दिला आहे.

(पान ४ वर)

## येत्या ८ दिवसांत अंबादास दानवे स्फोट घडवणार: आमच्या खांद्याला खांदा लावून कामही करणार

### आ.संतोष बांगर यांचा मोठा दावा

मुंबई दि.१९ (प्रतिनिधी)- अंबादास दानवे हे येत्या ८ ते १० दिवसात आमच्यासोबत असतील असा मोठा दावा शिंदे गटाचे आमदार संतोष बांगर यांनी केला आहे. तसेच उद्धव ठाकरेंनी शिवसेनेचा सत्यानाश करून टाकला अशी टीकाही त्यांनी केली आहे. अंबादास दानवे यांच्याबाबत त्यांनी केलेल्या दाव्याने मात्र राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

ते म्हणाले, अंबादास दानवे माझे मित्र आहेत. त्यांच्यावर बोलण्यासारखे फार नाही. येत्या आठ ते दहा दिवसांत ते आमच्यासोबत असतील. आमच्या खांद्याला खांदा लावून ते काम करताना दिसतील. आता अर्थच दिवसांत ते स्फोट घडवून आणतील. तसेच शिवसेनेने त्यांना उमेदवारी दिली तरी चांगलीच बाब आहे. मात्र त्यांच्या उमेदवारीचे नाव आमच्याकडूनच येऊ शकते, असे बांगर म्हणाले.

पुढे संतोष बांगर यांनी ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर जहरी टीका केली आहे. बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेना (पान ४ वर)

## भाजपचे हिंदुत्व थापेबाज, विरोधकांचे डिपॉझिट जप्त करू, उद्धव ठाकरे उमरखेडमध्ये कडाडले

यवतमाळ दि.१९ (प्रतिनिधी)- राज्यात महाविकास आघाडीचे समीकरण जुळल्यानंतर ही शिवसेनेची पहिलीच निवडणूक आहे. या निवडणुकीत विरोधकांचे डिपॉझिट जप्त करून दाखवू, असा विश्वास शिवसेना (उबाठा)चे पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केला. ते आज मंगळवारी दुपारी उमरखेड येथे आयोजित सभेत बोलत होते. हिंगोली-उमरखेड लोकसभा मतदारसंघात सोमवारपासून उद्धव ठाकरे यांची जनसंवाद सभा सुरू आहे. यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड विधानसभा मतदारसंघ हिंगोली लोकसभा मतदारसंघात समाविष्ट आहे. त्या अनुषंगाने उद्धव ठाकरे यांनी आज उमरखेड येथे आयोजित जनसंवाद सभेस संबोधित केले. यावेळी खा. संजय राऊत यांच्यासह शिवसेना उबाठा आणि महाविकास आघाडीतील घटक पक्षांचे पदाधिकारी उपस्थित होते.

२०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर राज्यात महाविकास आघाडीचे समीकरण कसे अस्तित्वात आले, हा इतिहास सर्वांना माहिती आहे. मात्र या समीकरणानंतर शिवसेनेची ही पहिली निवडणूक आहे. त्यामुळे या निवडणुकीत मूळ शिवसेनेशी गद्दारी करणाऱ्यांना धडा शिकवायचा आहे. विरोधकांचे डिपॉझिट जप्त करून ही निवडणूक कशी जिंकून दाखवू शकतो, यासाठी ही निवडणूक शिवसेनेसाठी महत्वाची आहे, असे उद्धव ठाकरे यावेळी बोलताना म्हणाले. आपण राज्यात अडीच वर्षे उत्तम सरकार चालवून दाखविले. अगदी कोरोना काळात देशातील सर्वोत्तम काम करणारा मुख्यमंत्री म्हणून आपला गौरव झाला. मात्र हा गौरव येथील जनतेचा होता. नागरिकांनी साथ दिल्यामुळे सरकार, प्रशासन उत्तम चालवू शकलो, असे उद्धव ठाकरे म्हणाले.

## गडचिरोलीत चार नक्षलवाद्यांचा खात्मा, ३६ लाखांचे होते बक्षीस

गडचिरोली दि.१९ (प्रतिनिधी)- गडचिरोली जिल्ह्यातील रेपनपल्लीच्या जंगलात सोमवारी रात्री पोलिस-नक्षलवाद्यांमध्ये चकमक झाली. या चकमकीत पोलिसांनी चार नक्षलवाद्यांना ठार केले आहे. अहेरी तालुक्याअंतर्गत येणाऱ्या रेपनपल्लीच्या जंगलात काल रात्री ही चकमक झाली. सध्या घटनास्थळी पोलिसांचे सर्च ऑपरेशन सुरू असल्याची माहिती मिळत आहे. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांच्या -६० पथकाने केलेली ही कारवाई मोठे यश मानले जाते.

दरम्यान, पोलिसांनी खात्मा केलेल्या चार नक्षलवाद्यांवर ३६ लाखांचे बक्षीस होते. चकमकीनंतर पोलिसांनी मोठ्या प्रमाणात शस्त्रास्त्र देखील जप्त केली आहेत. यामध्ये -४७, एक कारबाईन, २ कट्टे नक्षली साहित्य इत्यादी जप्त करण्यात आले आहेत. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काह दिवसांपूर्वीच देशात आचारसंहिता लागू झाली आहे. निवडणुकी दरम्यान हल्ल्याच्या हेतूने हे नक्षलवादी गडचिरोलीत आले होते. तेलंगणा राज्य कमिटीच्या या नक्षलवाद्यांनी प्रंहिता नदिमार्गे गडचिरोलीत प्रवेश केल्याची माहिती मिळाली होती.

## एन्काउंटर स्पेशालिस्ट प्रदीप शर्मांना जन्मठेप

### लखन भैय्या फेक चकमक प्रकरणी हाय कोर्टाने सुनावली शिक्षा

मुंबई दि.१९ (प्रतिनिधी)- एन्काऊंटर स्पेशालिस्ट अशी ओळख असलेले प्रदीप शर्मा यांना मुंबई हायकोर्टाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. लखन भैय्या फेक एन्काऊंटर प्रकरणात प्रदीप शर्मांना दोषी ठरवण्यात आले आहे. मुंबई उच्च न्यायालयाने या प्रकरणात शर्मांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली. न्यायमूर्ती गौरी गोडसे आणि रेवती डेरे यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला आहे.

उच्च न्यायालयाने तीन आठवड्यांत प्रदीप शर्मा यांना मुंबई सत्र न्यायालयापुढे शरण येण्याचे निर्देश दिले आहेत. २००६ च्या लखन भैया एन्काउंटर प्रकरणाशी संबंधित अनेक याचिकांवर मुंबई उच्च न्यायालयाने मंगळवारी मोठा निर्णय दिला आहे. न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे आणि न्यायमूर्ती गौरी गोडसे यांच्या खंडपीठाने ८ नोव्हेंबर २०२३ रोजी या २००६ मध्ये दाखल केलेल्या १६ अपीलांच्या सुनावणीवर निकाल राखून ठेवला होता.

कुख्यात गँगस्टर छोटा राजनचा सहकारी राम नारायण गुप्ता उर्फ लखन भैयाच्या बनावट चकमक प्रकरणी प्रदीप शर्मा दोषी असल्याचे हायकोर्टाने म्हटलं आहे. या प्रकरणात २०१३ मध्ये सेशन कोर्टाने २१ आरोपींना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती आणि एन्काउंटर स्पेशलिस्ट प्रदीप शर्मा यांची निर्दोष मुक्तता करण्यात आली होती. वसईत राहणाऱ्या लखन भैया विरुद्ध गँगस्टर ॲक्टनुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. ११ नोव्हेंबर २००६ रोजी मुंबई पोलिसांच्या पथकाने छोटा राजन टोळीचा संशयित सदस्य म्हणून त्याला ताब्यात घेतले होते. त्याच दिवशी संध्याकाळी लखन भैय्याचे पश्चिम मुंबईतील वर्सोवा येथे एन्काउंटर झाले होते.

या इन्काऊंटरचं नेतृत्व माजी एन्काऊंटर स्पेशलिस्ट प्रदीप शर्मा यांनी केले होते. ही एक कथित (पान ४ वर)

## आमदार राजन साळवी यांच्या पुतण्याची एसीबीकडून पाच तास चौकशी

मुंबई दि.१९ (प्रतिनिधी)- शिवसेना ठाकरे गटाचे आमदार राजन साळवी यांच्यासह त्यांच्या कुटुंबियांवर बेहिशोबी मालमत्ता प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मंगळवारी राजन साळवी यांचे पुतणे दुर्गेश साळवी यांची ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयात (एसीबी) सुमारे पाच तास चौकशी करण्यात आली. यावेळी कार्यालयाबाहेर राजन साळवी देखील उपस्थित होते. माझ्यावर काही जणांचा राग असेल तर माझ्यावर कारवाई करा, परंतु माझ्या कुटुंबियांना त्रास देणे हे चुकीचे आहे. नियती त्यांना धडा शिकवेल. आम्ही सदैव उद्धव ठाकरे यांच्यासोबत आहोत असे राजन साळवी म्हणाले.

आमदार साळवी यांनी ऑक्टोबर २००९ ते २ डिसेंबर २०२२ या कालावधीत रत्नागिरीमध्ये वेगवेगळया ठिकाणी तीन कोटी ५३ लाख ८९ हजार ७५२ रुपयांची बेहिशेबी मालमत्ता जमा केली होती. त्याबाबतचे समाधानकारक स्पष्टीकरण त्यांनी सादर केले नाही. (पान ४ वर)

# न्याय्य आणि जबाबदार कृत्रिम बुद्धिमत्ता

कंझ्युमर्स इंटरनॅशनल (सीआय) ही जगभरातील ग्राहक संस्थांची शिखर संघटना आहे. या संघटनेचे १०० देशांतील २०० हून अधिक सभासद संघटना आहेत. प्रत्येक ग्राहकाला सुरक्षित आणि टिकाऊ उत्पादने किंवा सेवा मिळावी हे सर्वसाधारण उद्दिष्ट समोर ठेऊन तिचे काम चालू असते. आंतरराष्ट्रीय स्तरासाठी धोरणे निश्चित करणे आणि जागतिक बाजारपेठेत त्यांचा प्रचार आणि प्रसार करणे अशी विविध पातळीवरील महत्त्वाची कामे सातत्याने चालू असतात. कोणत्याही प्रकारचा व्यावसायिक अथवा राजकीय दबाव चालू दिला जात नाही. अशा प्रकारे अत्यंत सुनियोजित, स्वतंत्र, निष्पक्ष आणि प्रामाणिकपणे कार्य होते.

बऱ्याचदा उत्पादकांना किंवा सरकारला सोयीस्कर नियम बनवले जातात. यामध्ये ग्राहकांना मात्र गैरसोयीची किंमत सोसावी लागते. ती पैसा, आरोग्य, हक्क किंवा कधी कधी तर जीवाच्या स्वरूपात सुद्धा असू शकते. तरी अलीकडच्या काही दशकात अनेक देशांमध्ये ग्राहक संरक्षणात सुधारणा झाली आहे, असे म्हणावे लागेल. पुढच्या दहा वर्षांत नेमके आपल्याला कोठे पोहोचायचे आहे किंवा २०५० साली कोणते उद्दिष्ट साध्य व्हायला हवे आहे, हे निश्चित करून त्यानुसार कार्यक्रम किंवा उपाययोजना ठरविल्या जातात. 'ग्राहकांचे हित' या आद्य लक्ष्याचा विचार करता असे लक्षात आले की, त्यात तीन महत्त्वाच्या मुद्द्यांवर लक्ष देणे अगत्याचे आहे. हे मुद्दे म्हणजे टिकाऊपणा, डिजिटलायझेशन आणि सर्वसमावेशकता. वर्तमान जीवनशैलीनुसार आपण वागत राहिलो तर २०५० पर्यंत पृथ्वीवरील सर्व संसाधने संपून जातील. 'यूएन सस्टेनेबल डेव्हलपमेंट'च्या आनुषंगाने, शाश्वत उत्पादन आणि वापर सुनिश्चित करणे हे प्रथम आणि प्रमुख लक्ष्य आहे आणि जागतिक स्तरावर हे सर्वात कठीण पण अत्यंत महत्त्वाचे काम आहे.

जगातील जवळपास निम्मी लोकसंख्या इंटरनेट वापरते. २०१९ मध्ये विकसनशील देशांमध्ये ४७टक्के टक्के लोक इंटरनेट वापरत होते, आज तीच संख्या ८७ टक्क्यांपर्यंत पोहोचली आहे. सर्व ग्राहकांना परवडणारे आणि कार्यक्षम इंटरनेट कनेक्शन मिळणे आता पूर्वीपेक्षा अधिक महत्त्वाचे आहे. विशेषत: पेरू, भारत आणि मलेशिया या देशांनी चांगली प्रगती दाखवली आहे.

जागतिक स्तरावर, ग्राहकांना सक्षम करण्यासाठी आणि सार्वजनिक आरोग्य, पर्यावरण आणि शिक्षण यांसह अनेक क्षेत्रांमध्ये सुधारणांना गती देणे, सर्व ग्राहकांसाठी पाणी, अन्न, वीज आणि आरोग्य सेवा यांसारख्या मूलभूत गरजा उपलब्ध करून देणे, असुरक्षित ग्राहकांचे संरक्षण आणि सशक्तीकरण करणे यासारखी उद्दिष्टे ठेवणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे सर्वसमावेशकता हा हेतू पूर्णत्वास जाऊ शकेल. २०५० सालचे ध्येय गाठायचे असेल, तर ग्राहकांचे संरक्षण आणि बळकटीकरण यावर अधिक लक्ष दिले पाहिजे. ग्राहकांचे वैयक्तिक अधिकार वापरत त्यांच्याच सामूहिक शक्तीचा वापर करत ग्राहकहिताचे ध्येय गाठू शकू, असा सीआयला विश्वास आहे. अशा रीतीने जागतिक स्तरावर काम करणारी सीआय दर वर्षी १५ मार्च हा दिवस 'जागतिक ग्राहक हक्क दिन' म्हणून साजरा करते. यानिमित्ताने सर्वांचेच ग्राहकहित आणि संरक्षणाकडे लक्ष वेधले जाते. प्रत्येक वर्षासाठी ग्राहकांच्या संदर्भातील महत्त्वाचा मुद्दा त्या वर्षीची 'थीम' म्हणून घोषित केला जातो. या वर्षासाठी ही थीम 'न्याय्य आणि जबाबदार कृत्रिम बुद्धिमत्ता' अशी असणार आहे.

येणारा जमाना आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) असणार आहे. स्वप्नातीत वाटावे असे काम एआय करू शकेल. ॲप्लिकेशन्स व्हॉइस पॉवर्ड गुगल असिस्टंट्सपासून ते सिरी आणि ॲलेक्सापर्यंत त्यांचा उपयोग होणार आहे. लोकांच्या प्रश्नांना उपलब्ध माहितीमधून योग्य, उपयोगी पडेल असे उत्तर शोधून देणार आहे. ग्राहकांच्या दृष्टीने एआय कसे महत्त्वाचे आहे, ते पाहूया. रोजच्या रोज विविध विषयांचा प्रचंड डेटा तयार होत असतो. एआय या डेटाचे विश्लेषण करेल. ग्राहक इंटरनेटवर काय शोधत आहेत याचा अभ्यास करेल. ही माहिती उत्पादकांसमोर ठेवेल. यामुळे ग्राहकांना नेमके काय हवे आहे हे समजेल. त्यानुसार पुढील कार्यवाही करता येईल. नेमका आपला ग्राहक कोण हे लक्षात आले की विक्री, जाहिराती यांच्या पद्धती ठरवल्या जातील.

कोणत्या वेळी वापरकर्त्यांना ईमेल उघडण्याची अधिक शक्यता असते त्या वेळी ईमेल मार्केटिंग करावे इतक्या बारीक गोष्टींचा लक्षपूर्वक अभ्यास केला जाईल. वाढत्या स्पर्धेमुळे कोणाला काय ऑफर करायचे याकडे अधिक लक्ष दिले जाईल. उदा. जर एखाद्याला महिला आणि किशोरवयीन मुलींच्या आवडीबद्दल जाणून घ्यायचे असेल, तर एआयमार्फत डेटापर्यंत हे काम होऊ शकेल. क्लासिक फॅशन स्टाइल ब्रँड, मेकअप उत्पादनांची विक्री व्यवसाय एखादा माणूस सुरू करू शकेल, कारण त्याच्याकडे अचूक माहिती असेल. त्या आनुषंगाने धोरणे तयार करून त्याचा नफा वाढवू शकतो. त्याच वेळी ग्राहकांची खरेदी पर्यायाने खर्च वाढेल.

मायक्रोसॉफ्टच्या मते ९७टक्के ग्राहक म्हणतात की, ब्रँड निवडीसाठी ग्राहक सेवा हा महत्त्वाचा घटक असतो. एआयने ही सेवा वाढवण्यास मदत केली आहे. चॅट बॉट्सद्वारे ग्राहकांना त्वरित प्रतिसाद मिळतो, शिवाय ते दिवसाचे चोवीस तास उपलब्ध असते. क्लस्टरिंग आणि ग्राहकांबद्दल संकलित केलेल्या डेटाद्वारे ग्राहकांच्या आवडी आणि नापसंती कोणीही सहजपणे जुळवू शकतो आणि त्यांना उत्पादनाच्या किंवा सेवेच्या विशिष्ट पर्यायाची शिफारस करू शकतो. एआयमुळे ग्राहकांची मोठी सोय झाली आहे, असे म्हणायला हरकत नाही. अपॉइंटमेंट बुक करणे, व्हर्च्युअल शॉपिंग करणे, तुमच्या घराच्या सुरक्षेचे निरीक्षण करणे हे फक्त एका क्लिकच्या अंतरावर असेल, अशी कधी कोणी कल्पनाही केली नसेल. अशा प्रकारे एआय जीवनाच्या प्रत्येक पैलूत आणि विशेषतः किरकोळ क्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावेल, यात शंका नाही. असे असले तरी लोकांना त्याच्या वापराबद्दल माहिती देण्याची नितांत गरज आहे, जेणेकरून अधिकाधिक लोक एआयचा सुयोग्य वापर करू शकतील. एआय आपले भविष्य आहे. गोळा होत असलेल्या डेटामध्ये आपल्या प्रत्येकाचा डेटा संकलित होत आहे, त्यामुळे गोपनीयता ही मुख्य चिंता आहे, हे लक्षात आले आहे. ग्राहकांना त्यांची माहिती सुरक्षित व्हायला हवी आहे. एआयचा वापर करून सुरक्षित धोरण तयार करणे हे एक महत्त्वाचे आहे. तंत्रज्ञान वाईट नसतं, ते वापरणाऱ्या माणसाच्या मनात आणि हेतूमध्ये असते. डीप फेक, व्हॉइस क्लोनिंगद्वारे ग्राहकांची फसवणूक होऊ शकते, म्हणूनच सीआयचे ध्येय अधिक निकडीचे बनले आहे, हे निश्चित.

# आई चिमणीचे नाव घेऊन घास भरवायची; आज चिमण्यांना वाचविण्याची जबाबदारी आपल्यावर आहे



**जागतिक चिमणी दिवस**

**जागतिक चिमणी दिवस साजरा करतांना चिमण्यांना व संपूर्ण पशुपक्ष्यांना कशा पध्दतीने वाचविता येईल यासाठी सर्वांनीच प्रयत्न करायला हवेत. चिमण्यांना रहाण्याकरीता घरटे नाहीत याकरिता वृक्षारोपण व्हायला हवे, उन्हाळ्यात चिमण्यांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागते. त्यामुळे आतापासूनच जीथे-जीथे चिमण्या येवू शकतात तीथे-तीथे किंवा आपल्या घराच्या भिंतीवर किंवा घरावर एखाद्या तबकड्यात पाणी अवश्य ठेवावे सोबत खाण्याकरिता थोडे तांदळाचे दाणे किंवा खाद्य टाकावे.कारण चिमण्यांना खरोखरच आपली नितांत गरज आहे.अन्यथा ज्या चिमण्या दिसतात त्या सुध्दा लुप्त होवू शकतात याला नाकारता येत नाही.कारण दिवसेंदिवस चिमण्यांचे प्रमाण कमी-कमी होतांना दिसत आहे. चिमण्यांच आपल्या मानव जातीवर खुप मोठे उपकार आहेत ते तर आपण फेडु शकत नाही.परंतु आज बदलत्या काळानुसार त्यांच्यावर मोठे संकट ओढावले आहे.त्यातुन मुक्त करण्यासाठी थोडा हातभार आपण लावु शकतो याकरिता पाण्याची सोय व खाद्यान्नाची सोय सर्वांनीच आपापल्या परीने केली पाहिजे.**

**चिमण्यांच्या** अनुषंगाने अनेक पक्षी पाण्याचा व खाद्यान्नाचा स्वाद अवश्य घेतील आणि आयुष्य वाढेल व चिमण्यांचा किलबिलाट सर्वत्र दिसून येईल.जगातील चिमण्यांची घटती संख्या लक्षात घेता जगातील देशांनी चिमण्यांना वाचविण्याच्या दृष्टीकोनातून जागतिक चिमणी दिवस साजरा करण्याचे जाहीर केले.याकरीता २० मार्च ही तारीख ठरविण्यात आली आणि राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय संस्थांच्या सहाय्याने पहिला जागतिक चिमणी दिवस २० मार्च २०१० ला साजरा करण्यात आला.भारतात सगळीकडे सर्वात जास्त संख्येने सापडणारा,मानसाच्या जवळपास वावरणारा व नेहमी डोळ्यांनी दिसणारा पक्षी म्हणून चिमणीची भारतभर चांगलीच ओळख आहे.आज जगातील बदलत्या तापमानामुळे व हवामानामुळे, परमाणू परिक्षण, वाढते औद्योगिकीकरण, मोबाईलचे टॉवर,वाढते शहरीकरण, जंगलतोड, शेतातील रासायनिक खतांचा वापर व किटकनाशके,वणवे लागणे,ध्वनी प्रदुषण, पाणथळ्यांच्या जागा नष्ट झाल्याने आणि जगातील यूध्दजन्य परिस्थिती यामुळे चिमण्यांसह अन्य पशु-पक्षांचे जगणे अत्यंत कठीण झाले असुन धोकादायक स्थितीत आहे.यामुळे अनेक पशु-पक्षी लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत. आज जंगल तोडीमुळे जंगलातील पशु-पक्षी शहराकडे धाव घेतांना दिसते.हा संपूर्ण प्रकार निसर्गाचा होत असलेल्या ह्रासामुळे दिसून येतो व मानवजातीच्या अतीक्रमनामुळे निर्माण झाला आहे.पुर्वी कवेलुचे घर असायचे, मातीच्या भिंती असायच्या त्यामुळे चिमण्या आपले घरटे कुठे तरी अवश्य बनवायचे. कारण कवलाचे घर व मातींच्या भिंती नेहमी थंड असतात याचा सहारा घेऊन रहायचे.त्यामुळे प्रत्येक घरामध्ये आपल्याला चिमण्यांचे घरटे अवश्य दिसायचे व चिमण्यांचा मधुर किलबिलाट ऐकू यायचा.यावरून सकाळचा काय वेळ झाला आणि संध्याकाळचा काय वेळ झाला हे त्यांच्या किलबिलाट वरून ताबडतोब सर्वांनाच लक्षात यायचे.परंतु आज चिमण्यांचा किलबिलाट नामशेष झाल्याचे दिसून येते. आज चिमण्यांना घरटे बांधण्यासाठी योग्य जागा मिळत नाही, पाण्यासाठी वणवण हिंडावे लागते अशी भयावह परिस्थिती आज चिमण्यांची झाली आहे.आज घरांचे सिमेंटीकरण झाल्याने चिमण्यांना घरटे बांधण्यास मोठा संघर्ष करावा लागतो आहे.वाढत्या प्रदुषणांमुळे व उष्णतामानामुळे चिमण्यां व इतर पशु-पक्षांना हवेत मोकळा स्वास सुध्दा मिळु शकत नाही.अशी कठीण परिस्थिती पशु-पक्षांवर असलेली आहे. आपण चीनचा विचार केला तर १९५८-६२ या कालावधीत चार किटक मोहिम राबविण्यात आली त्यात पिकांचा नाश करणाऱ्या घटकांना म्हणजे उंदीर,माश्या,डास आणि चिमण्या हे चार नष्ट करायचे सरकारने ठरविले.यामुळे चीनमध्ये चिमण्या जवळपास संपुष्टात आल्याचे दिसून येते.त्यामुळे याचा गंभीर परिणाम चीनच्या पर्यावरणावर झाला आहे. यानंतर पक्षी तज्ज्ञांनी अभ्यासाच्या अंती सांगितले की चिमणी पर्यावरणाच्या दृष्टीने जगाला आवश्यक आहे.जगभरात २६ जातिंच्या चिमण्यांची नोंद आहे.परंतु यातील अनेक चिमण्यांच्या जाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. जगातील पक्षांचा विचार केला तर ८६७ प्रजाती आहेत.परंतु गेल्या पंचवीस वर्षांत आतापर्यंत पक्षांच्या संख्येने सर्वात मोठी घट झाली आहे ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे. त्याचप्रमाणे कीटकभक्ष्यी चिमण्यांची संख्या कमी होने अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.कारण चिमण्यांची घटती संख्यांचा प्रश्न सामान्य माणसाच्या दैनंदिन जीवनावर परिणाम करणारा आहे.कारण पिकांवर पडणाऱ्या अळया आणि किटक चिमण्या खायच्या परंतु चिमण्यांच्या घटत्या संख्येमुळे पिकांवर सुध्दा दुष्परिणाम होतांना दिसतो. एकेकाळी चिमणी हा आपला अत्यंत महत्त्वाचा पक्षी होता कारण लहान मुले जेवणाकरीता कंटाळा करायचे तेव्हा आपली आई किंवा आजी चिमणीची आठवण अवश्य करायची व लहान मुले पोटभर जेवण सुध्दा करायची.

'चिव चिव ये चारा खा पाणी पी आणि भुर्र उडून जा' असे म्हणत आपला घास भरत यामुळे आपलं बालपण समृद्ध झाले. कारण आई व आजी इतर पक्षांची ओळख करून देतांना चिऊताईचा लाड जास्तच करायची. चिमण्यांनी आपल्याला बरेच काही दिले त्यामुळे आज त्यांना आपल्या कडून फक्त पाण्याची अपेक्षा आहे ती आपण अवश्य पुर्ण करू या.जागतिक चिमणी दिवसाचे औचित्य साधून भारतासह जगातील संपूर्ण देशांनी आजच्या दिवशी मोठ्या प्रमाणात वृक्षारोपणाचा संकल्प करावा व वृक्षारोपण करावे.यामुळे गुरांना चारा,पशु-पक्षांना रहाण्यासाठी घरट्यांसाठी जागा उपलब्ध होईल, मानवाला शुद्ध हवा व ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत होईल.यामुळे पर्यावरण सुधारण्यास मदत होईल व निसर्ग प्रफुल्लित राहील आणि जिकडे-तिकडे हिरवागार गालिचा पसरलेला दिसुन येईल. आपण सर्वांनीच चिमण्या वाचविण्याचा संकल्प करूया.

**- रमेश कृष्णराव लांजेवार**
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)

# शिवराय ते भिमराय समता मार्च महाड




**छत्रपती** शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दोन महामानवांना देव करून त्यांचा फक्त जयजयकार करण्याचे काम आर एस एस प्रणित भाजप, संस्था, संघटना, शिवसेना मनसेच्या भटा ब्राम्हणांनी चालविले आहे. त्यात मराठा व महार बौद्ध समाज अलगत अडकत चालला आहे.या दोन्ही महापुरुषांच्या क्रांतिकारी विचाराला आणि कार्यप्रणालीला मूठमाती देऊन जातीजातीत बंदिस्त करण्याचे काम वस्ती पातळीवर जोरात सुरू आहे.

चवदार तळे महाडच्या सत्याग्रहातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या खांद्याला खांदा लावुन उभे राहिलेले सहकारी गंगाधरपंत सहस्त्रबुद्धे, अनंतराव विनायकराव चित्रे, सुरबा नाना टिपणीस, प्रधान बंधु, संभाजी तुकाराम गायकवाड, सुभेदार विश्राम सवादकर, आर बी मोरे, शिवराम जाधव, सी ना शिवतरकर, पा न राजभोज, एन टी जाधव हे मुख्य सहकारी होते. यांना ही त्यांच्या जाती बांधवांनी संघटनांनी ब्रहिस्कृत केले होते.

त्यावेळी दर्याखोऱ्यातील सर्व जाती पातीच्या मावळ्यांना एकत्र करून रायगडावरून स्वराज्याचा कारभार करणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या कोकणातील महाड चवदार सत्याग्रहाची किती झळ पोहचली होती.

शिवरायांच्या रयतेच्या राज्यात जातीव्यवस्था तीव्र नव्हती. नंतरच्या काळात पेशव्यांनी शुद्रा अतिशूद्रांचे जिने हराम केले.त्यात सार्वजनिक ठिकाणी पिण्याचे पाणी मिळत नव्हते. म्हणूनच महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह झाला. हा चवदार तळ्याचा इतिहास नव्याने सांगण्याचे काम विचारांचा जागर व त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी विविध संस्था संघटनांच्या किर्याशील कार्यकर्त्यानी संकल्प जाहीर केला आहे. १९ मार्च १९२७ ला महाड मध्ये काय घडले होते त्यात कोण कोण सहभागी होते. त्यांची आठवण म्हणून २०१८ ला रायगड पाचाड ते महाड चवदार तळे समता मार्च निघाला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९ व २० मार्च १९२७ रोजी महाडच्या चवदार तळ्यावर समताधिष्ठित बहुजन समाजासाठी सत्याग्रह केला. यंदा या सत्याग्रहाला ९७ वर्ष पूर्ण होत आहेत. त्या निमित्ताने दरवर्षा प्रमाणे या ही वर्षी लाखो लोक महाडला दर्शनासाठी येत असतात.

१९ मार्च २०१८ ला रायगड पाचाड ते महाड चवदार तळे समता मार्च निघाला होता. २० मार्चला लाखो लोक दरवर्षी येतात, पण १९ मार्चला काय झाले होते यांची माहिती घेत नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकरानी आजच्याच दिवसी २० मार्च १९२७ साली चवदार तळ्याचा सत्याग्रह केला आणि तळ्याचे पाणी सर्व मानवजाती साठी खुले केले. केवळ महार जातीसाठी चवदार तळे नव्हते. डॉ बाबासाहेबाच्या क्रांतिकारी विचाराने चवदार तळाच्या पाण्याला हात लावताच आग लागली. ती महाड मध्ये सुरु झालेली आग राज्यातून देशभर पसरली. ते क्रांतिकारी वैचारिक संघटन कौशल्य आज कोणत्याही नेत्याकडे नाही. शिवराय ते भिमराय समता मार्च १९ मार्च २०१८ ला रायगड पाचाड ते महाड चवदार तळे समता मार्च निघाला होता. त्यात मराठी साहित्य संमेलनात क्रांतिकारी विचार मांडून वैचारिक खळबळ निर्माण करणारे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख, माजी मराठी साहित्य संमेलनाध्यक्ष सकाळ समूहाचे मुख्य संपादक उत्तम कांबळे, प्रा.अंजली मायदेव कर्वे इन्स्टिट्यूट पुणे,फारूक अहमद सुराज्य सेना प्रामुख्याने उपस्थित राहिले होते.

१९ मार्च १९२७ च्या सत्याग्रहात ज्यांनी सहभाग नोंदविला होता त्यांचे नातु पणतू पण सहभागी झाले होते. त्यात उल्का महाजन, मधुकर गायकवाड, मिलिंद टिपणीस, श्रीप्रकाश अधिकारी, आरिफ करंबेळकर, सुभाष वारे, युवराज मोहिते, अनिता पगारे, ललित बाबर, सुरेश सावंत, अविनाश कदम, भूषण सिसोदे, नागेश जाधव, कालीदास रोटे, प्रदिप शिंदे, सागर तायडे असे विविध संस्था संघटनेचे प्रतिनिधी सहभागी झाले होते आणि एक नवी वैचारिक चर्चा घडविण्याचा प्रयत्न झाला होता. २०२४ ची लोकसभा निवडणूक जाहीर झाल्यामुळे शिवराय ते भिमराय समता मार्च महाड चवदार तळे ही वैचारिक चर्चा खेड्यापाड्यात सुरू झाली पाहिजे. कारण महाराष्ट्रातील सत्तातरांत शिवसेनेचे शिवसैनिक आणि राज ठाकरे यांची मनसे सैनिक, राष्ट्रवादीचे मराठा सैनिक यांना आता खऱ्या अर्थाने छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांचे स्वराज्य याची वैचारिक ओळख झाली असावी कारण त्यांना काल पर्यंत गोब्राम्हण पतीपालक शिवाजी शिकविला गेला होता.

सर्वजाती धर्मावर निस्वार्थ प्रेम करणारा रयतेचा राजा त्यांना कधी सांगितला गेला नव्हता. म्हणूनच छत्रपती शिवाजी महाराजाच्या नांवाचा वापर करून आणि आशीर्वाद घेऊन मोदी केंद्रात सत्ताधारी झाले आणि देवेंद्रने राज्यात मराठा वतनदार जात दांडगे, धन दांडगे यांच्यात ई डी ची भीती घालून उभी फुट पडली. त्यामूळेच शिवराय भिमराय यांच्या विचारांची गांभीर्याने चर्चा झाली पाहिजे. त्यासाठीच महाडचा चवदार तळे सत्याग्रह हा एका जाती धर्माचा राज्याचा इतिहास नाही तर एकूण मानवाच्या मुक्तीचा सत्याग्रह होता. हे आजच्या तरुण पिढीने लक्षात घेतले पाहिजे. हाच शिवराय ते भिमराय समता मार्च महाड आहे.

मराठा समाजाच्या तरुणाच्या डोक्यात मुस्लीम तिरस्कार प्रचंड भरला गेला होता. त्यांच्या हाताखाली ओबीसी मागासवर्गीय तरुण कायमस्वरूपी तोडफोड दंगली करण्यासाठी वापरला जात होता. चवदार तळ्याच्या सत्याग्रहात रायगड पाचाड ते महाड मधील सर्व मावळा सहभागी होता. रायगडाच्या कोकणातील सुपीक जमिनीत जातीजातीचे बीज छत्रपती शिवाजी महाराज आणि राष्ट्रमाता जिजाऊ यांनी कधीच येऊ दिले नव्हते. दऱ्या खोऱ्यात राहणाऱ्या बारा बुलतेदाराना निसर्गाचे पाणी पिण्यासाठी कुठे ही संघर्ष करावा लागला नव्हता हा इतिहास आहे.मग महाडच्या चवदार तळ्याचे पाणी किंवा राज्यातील सर्वच सार्वजनिक ठिकाणी पाणी पिण्याचा हक्क नाकारणारे कोण होते.हा इतिहास शिवसैनिक मनसे सैनिकांनी वाचणे खूप आवश्यक आहे. शिवराय ते भीमराय समता मार्च चवदार तळे ही वैचारिक चर्चा घडवून आणली पाहिजे. आपण सहभागी होऊ शकत नसलो तरी यावर व्यापक चर्चा घडवुन शिवराय ते भिमराय समता कशी प्रस्थापित करता येईल यांचा विचार करू या. कोणती ही दळणवळणाची साधन नसतांना ज्यांनी या सत्याग्रहात सहभाग घेऊन यशस्वी संघर्ष केला त्या सत्यगृहींना कोटी कोटी प्रणाम!!!.

**- सागर तायडे**

## आनंदाचे डोही भाग - ९०

**थोर दुखावलें मनें ॥**
**पुढे उदंड शहाणें ॥**

मी स्वयंपूर्ण आहे, मी माझ्यासाठीच करेन, मला इतरांशी कांही देणे घेणे नाही, मी कोणासाठी काही करणार नाही, माझ्यासाठी कोणी काही केले नाही असे म्हणणे कोणीही म्हणणे संयुक्तिक होणार नाही. कारण आपण समाजाचा अविभाज्य भाग आहोत. आपल्यासाठी कोणीतरी, काहीतरी केलेलेच असते. आपणही कोणासाठी तरी काहीतरी करावेच लागते. बऱ्याचवेळा स्वतःसाठी केलेले सुद्धा बऱ्याच प्रमाणात इतरांच्या कामी येत असते.



काहीही करायचे म्हटले तरी काही प्रमाणात का होईना कष्ट ही करावीच लागतात. कष्ट म्हटले की बऱ्याचवेळा ताण, दुःख, वेदना, त्रास इत्यादीचा सामना शरीराबरोबर मनालाही करावा लागतो. पुढच्यास ठेंच मागचा शहाणा म्हटल्याप्रमाणे कोणालातरी शारीरिक, मानसिक दुःख, कष्ट भोगावी लागतात. त्याच्या दुःख, कष्टा अंती त्याच्याबरोबर इतरांनाही लाभ होऊ शकतो. एकाने दुःख, कष्ट भोगायची, पुढच्याने त्यातून शिकायचे, शहाणे व्हायचे आणि लाभ मिळवायचा हा निसर्गाचा नियमच आहे. या अनुषंगाने संत मुक्ताई म्हणतात,

**थोर दुखावलें मनें ॥ पुढे उदंड शहाणें ॥**

शास्त्रज्ञांनी लावलेले शोध, संतांनी घेतलेली अनुभूती ही कष्ट, दुःखातूनच फलित झालेली असते. आपणाला कष्ट पडली, कोणाचे बोलणे खावे लागले तरीही त्याचा विचार न करता एखाद्याने त्याचे कार्य केलेले असते. म्हणूनच त्याच्या कार्याचे फलित इतरांनाही मिळते. संतांना अनुभूती ह्या सामाजिक अवहेलनेतून, लोकांच्या विरोध व त्रासातून आल्याचे आपण पाहतो. ज्या लोकांसाठी द्यायचे त्याच लोकांचा त्रास सहन करायचा, असे अनेक संतांच्या बाबतीत घडले.

वय झाले तरी बरेच लोक घर बांधतात, व्यवसाय सुरु करतात. खरे म्हणजे हे लोक त्यांच्यासाठी कमी तर त्यांच्या मुलांबाळासाठी जास्त प्रमाणात करीत असतात. जाऊ द्या माझे वय झाले, मला आता काय करायचे असे जर प्रत्येकाने म्हटले किंवा ठरवले असते तर आज आपण बऱ्याच प्रमाणात उपलब्ध भौतिक सुखापासून दूर राहिलो असतो. आपणाला जसे इतरांनी सुखी केले आहे, तसे आपणही इतरांना सुखी केले पाहिजे. म्हणूनच अनेक लोक त्यांना लाभ मिळणार नाही, हे माहिती असतांनाही इतरांसाठी करीत राहतात. काही लोक करीत नाहीत. माझे लहानपणी एका शेजारी शेतकऱ्याला, बाबा आम्ही बांधावर आंब्याची, जांभळीची झाडे लावून पाणी घालतो, आपणही झाडे लावा. त्यावर ते म्हणाले, मला काय करायचे आहे, आता माझे वय झाले आहे. आता झाडे लावून मला फळ थोडेच खायला मिळणार आहे. असो, अशी वृत्ती असू नये. जय जय राम कृष्ण हरी.

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**

# अभ्यासकास कोणत्याही क्षेत्रात यश मिळू शकते - डॉ. विजयकुमार फड

भोकरदन, दि. १९ (प्रतिनिधी) – ध्येयाची निश्चिती करून अपेक्षित ध्येय गाठण्यासाठी सकारात्मक दृष्टीने सतत प्रयत्न करणारा केव्हा ना केव्हा यशस्वी होतच असतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी सकारात्मक दृष्टी जोपासून धेय्य प्राप्तीच्या अनुषंगाने अभ्यास करावा असे प्रतिपादन ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड यांनी केले.

भोकरदन तालुक्यातील गोकुळ येथे दरवर्षीप्रमाणे नवनाथ मंदिराच्या पटांगणात फड यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता. फड यांना आय. ए. एस. पदावर काम केल्याचा अनुभव असल्याने त्यांनी कीर्तनातून पालक व विदयार्थ्यांना मार्गदर्शन करावे अशी अपेक्षा संयोजकांनी केल्याने फड यांनी यशप्राप्ती या विषयावर भर दिला होता. यावेळी ते म्हणाले, स्पर्धा ह्या जिंकण्यासाठीच व परिक्षा ह्या पास होण्यासाठीच असतात. त्यामुळे स्पर्धा व परीक्षांकडे विद्यार्थ्यांनी सकारात्मक दृष्टीकोणातून पाहावे. सकारात्मक दृष्टी जोपासून ध्येय गाठण्यासाठी मन:पूर्वक प्रयत्न करणारा निश्चितच यशस्वी होतो, हे त्यांनी अनेक उदाहरणाव्दारे स्पष्ट केले. परिस्थितीपेक्षा मन:स्थिती जास्त



महत्त्वाची असते. मन:स्थिती पक्की असेल तर कसल्याही परिस्थितीवर मात करता येते, हे त्यांनी स्वत:च्या अनुभवातून व तोंड दिलेल्या परिस्थितीतून सोदाहरण पटवून दिले. अगा अभ्यासयोगु म्हणिजे । तो हा एकु जाणिजे । येणें कांहीं न निपजे । ऐसें नाहीं ।।, असाध्य ते साध्य करिता सायास। कारण अभ्यास तुका म्हणे?, केल्याने होते आहे रे। ते आधि केलेचि पाहिजे?, प्रयत्ने वाळूचे कण रगडिता तेलही गळे?, अशा श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या, तुकाराम महाराजांच्या व इतर संतांच्या काही संतोत्त्या त्यांनी सांगितल्या. विद्यार्थी घडण्यामध्ये पालकांची भूमिका ही महत्त्वाची असल्याचे सांगतांना त्यांनी काही दाखले दिले. मुलं हीच खरी संपत्ती असल्याने पालकांनी या शाश्वत संपत्तीकडे लक्ष द्यावे. विद्यार्थ्यांनी स्पर्धा ही स्वत:शी करावी. कालच्यापेक्षा आज आणि आजच्यापेक्षा उद्या मी चांगला होईन, अभ्यास वाढवेन असे पाहावे. विद्यार्थी अवस्थेत नको त्या गोष्टीकडे लक्ष घातले तर भविष्य अंध:कारमय होवू शकते. ठरविलेल्या उद्दिष्टांकडे लक्ष एकाग्रीत केले तर जीवन प्रकाशमय होउ शकते. काही विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेचा नेमका अभ्यास कसा करावा, कोणती पुस्तके वाचावीत या अनुषंगाने तर कांही विद्यार्थ्यांनी व्यक्तीगत प्रश्नातून बाहेर पडण्याच्या तसेच पालकांनी मुलांना कसे समजून घ्यावे या अनुषंगाने मार्गदर्शन घेतले. या कार्यक्रमातून आम्हाला अभ्यासाची व अडीअडचणींवर मात करण्याची अत्यंत चांगली दिशा मिळाल्याचे अनेक विद्यार्थ्यांनी त्यांच्या प्रतिक्रीयेतून सांगीतले. पालक व संयोजकांनीही फड यांचे आभार मानले.

# परिक्षार्थींनी नियोजनात्मक अभ्यास करून यश संपादन करावे

## - सहव्यवस्थापकीय संचालक राहुल गुप्ता

छत्रपती संभाजीनगर, दि. १९ (प्रतिनिधी) – स्पर्धा परिक्षेतील परिक्षार्थी यांनी आपणास काय व्हायचे आहे ? हे ठरवून अभ्यासक्रमाची निवड करून नियोजनबध्द पूर्व नियोजित अभ्यास करून यश संपादन करावे असे प्रतिपादन महावितरण प्रादेशिक कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक राहुल गुप्ता यांनी केले यांनी केले.

महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांचे पाल्य व पालकांसाठी युपीएससी, वैघकीय, अभियांत्रिकी प्रवेश परिक्षा नीट, आय आय टी व समकक्ष परीक्षेची तयारी करीत असणाऱ्या विघार्थी यांच्यासाठी महावितरण प्रादेशिक कार्यालयात सहव्यवस्थापकीय संचालक राहुल गुप्ता यांनी प्रत्यक्ष व व्हिडीओ कॉन्फर्सिंगद्वारे विघार्थी यांना मार्गदर्शन करण्यासाठी कार्यक्रम घेण्यात आला. त्याप्रसंगी ते बोलत होते.



सहव्यवस्थापकीय संचालक राहुल गुप्ता पुढे मार्गदर्शन करतांना म्हणाले की, विघार्थी १० वी, १२ वी, पदवी परीक्षा उत्तिर्ण होण्या अगोदर आपणाला काय व्हायचे आहे? हे पालक आणि विघार्थी यांनी ठरवून नियोजन करावे. आपले लक्ष नेहमी मोठे ठेवा. न्युन्यगंड बाळगू नये. त्यानंतर संबंधित परिक्षेसाठी लागणारे पुस्तक, नोटस, प्रश्नसंच संकलन करून अभ्यासक्रम आणि परिक्षेसाठी उपलब्ध वेळ याचे योग्य नियोजन करून अभ्यास करावा. शॉर्ट नोटस तयार करावे. प्रश्नसंचाची सतत चाचणी परिक्षा देवून आपण कोठे कमी पडतो. त्याची आत्मपरिक्षण करावे. व त्यानुसार सुधारणा करून परिक्षेची तयारी करावी. जेईई परिक्षार्थींनी एनसीईआरटी, एम लक्ष्मीकांत आदी अभ्याक्रमातील पुस्तकांचा अभ्यास करावा. परिक्षार्थींनी परिक्षेची तयारी करीत असतांना जास्त तणावात येवू नये. परिक्षेसोबतच पुस्तक वाचन, खेळ खेळणे, मनोरजंनाचा आनंदही घ्यावा असाही सल्ला त्यांनी यावेळी दिला. यापुढे दर आठवडयाला स्पर्धा परिक्षेची तयारी करणाऱ्या संपूर्ण महाराष्ट्रातील महावितरणचे पालक आणि विघार्थी यांच्यासाठी प्रत्यक्ष व व्हिडीओ कॉन्फर्सिंगद्वारे मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

या प्रत्यक्ष व व्हिडीओ कॉन्फर्सिंगद्वारे मार्गदर्शन कार्यक्रमासाठी महावितरण कंपनीतील पालक, त्यांचे पाल्य, अभियंते अधिकारी, कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# गुरुजी हमारे आये है, नई रोशनी लाये है घोषणेने परिसर दुमदुमला

## राष्ट्रसंत आचार्य देवनंदीजी महाराज यांचे वेदांतनगर जैन मंदिरात भव्य आगमन

छत्रपती संभाजीनगर, दि. १९ (प्रतिनिधी) – प.पु.गनाधिपती गनधराचार्य कुंथुसागरजी महाराज यांच्या उपवनातील सुगंधीत पुष्प राष्ट्रसंत आचार्य देवनंदीजी महाराज ससंघाचे आज हातनुर येथील वेदीप्रतिष्ठा महोत्सवाचे कार्यकम संपवुन आचार्य संघाचे सज्जनपुर,वेरूळ मार्गाने कर्णपुरा जैन मंदिर, आर्यनंदी कॉलनी, वेदांतनगर जैन मंदिरात भव्य आगमन झाले.

यावेळी आचार्यश्रीच्या पुढे महिला डोक्यावर मंगल कलश घेवुन पुढे चालत होत्या. सुमधुन बॅन्ड पथकाच्या सानिध्यात भाविक मंत्रमुग्ध होत होते. गुरुजी हमारे आये है, नई रोशनी लाये है जैन धर्म की जय अंहिसा परमौ धर्म की जय अशा अनेक घोषणनानी परिसर दुमदुमला तसेच ठिकठिकाणी आचार्यश्रीच्या संघावर पुष्पवृष्टी व पादपुजा करण्यात येत होती.



तसेच ठिकठिकाणी सुंदर रांगोळया काढण्यात आल्या होत्या. शोभायात्रेत महिलांनी केशरी,पिवळया व लाल रंगाच्या साडया परिधान केल्या होत्या तर पुरूषांनी पांढरे वस्त्र परिधान केले होते. तसेच भाविक धर्म ध्वजा घेवुन पुढे चालत होते.

आर्यनंदी कॉलनीच्या वतीने आचार्यश्रीचे स्वागत कोकणवाडी येथे अहिल्याबाई चौक येथे करण्यात आले.यावेळीआ अतूल सावे नंदकुमार घौडेले व सकल जैन समाजाचे पदधीकारी हजर होत आचार्यश्रीचे मंदिरात आगमन झाल्यावर मंदिराच्या वतीने पादपक्षान करण्यात आले.

तदनंतर भगवंताचा पंचामृत अभिषेक करण्यात आला यावेळी शांतीमत्राचे पठण आचार्य देवनंदीजी महाराज यांनी केले. युवा विधानाचार्य अभिषेक जैन यांच्या मार्गदर्शनाखाली सिध्दचक विधानाचे प्रारंभ करण्यात आले. हे विधान माणिकचंदजी, महावीर, प्रकाश, राजेंद्र, सेठी परिवार धोंडराईवाला यांच्या वतीने करण्यात येते आहे.

यावेळी आचार्य देवनंदी महाराज यांनी छत्रपती संभाजीनगर शहरातील सामाजिक एका हि प्रशंसनीय आहे. समाजातील महिला, पुरुष, लहान मुले हे अत्यंत धार्मिक वृत्तीचे आहे असेही सांगीतले.

यावेळी आर्यनंदी कॉलनी, राजाबजार जैन पंचायत, अरिहंतनगर, बालाजीनगर, सिडको हडको, चिंतामणी कॉलनी, मोहनलाल नगर आदी ठिकाणाहुन हजारो भाविक उपस्थित होते.

# 'जन्मऋण'चे गुपित २२ मार्च २०२४ रोजी चित्रपटगृहात पहा!

मुंबई, दि. १९ (प्रतिनिधी) – लोकप्रियतेचा उचांक गाठणाऱ्या दामिनी या मालिकेच्या लेखिका, निर्माती आणि दिग्दर्शक अर्थात अभिनेत्री कांचन घारपुरे उर्फ कांचन अधिकारी ह्या एक नवा विलक्षण विषय घेऊन प्रेक्षकांच्या भेटीला येत आहेत. आपल्या सुसंस्कृत मराठमोळ्या कुटुंबात घडलेल्या सत्यघटनेवर त्यांनी 'जन्मऋण' या नव्या चित्रपटाची निर्मिती केली आहे. मनोरंजनातून प्रभोधन करीत थेट प्रेक्षकांच्या काळजात स्थान मिळविण्यासाठी 'आभाळमाया' या पहिल्या लोकप्रिय दैनंदिन मालिकेतील जोडी शरद आणि सुधा जोशी अर्थात अभिनेते मनोज जोशी आणि अभिनेत्री सुकन्या कुलकर्णी यांची साथ त्यांना लाभली आहे.

आज निव्वळ भारतात ३२,००० च्या वर केसेस आहेत ज्यात स्वतःच्या मुलानेच आपल्या आई-वडिलांना त्यांच्या म्हातारपणी आपल्यापासून दूर केलेले आहे. 'जन्मण' हा नवीन चित्रपट याच विषयावर आधारित आहे. न्यायालयातर्फे अशा मुलांना शिक्षाही आहेत. जन्मदात्या आई-वडिलांना न सांभाळणाऱ्या मुलांना 'कलम-५' तर्फे तुरुंगवासही भोगाव लागतो. समाजात आपल्या आई-वडिलांना प्रेमाने व आदराने आपल्या मुलांनी वागवावे केवळ याच एका सद्भावनेने या चित्रपटाची निर्मिती व दिग्दर्शन कांचन अधिकारी यांनी केलेले आहे. आतापर्यंत आपण त्यांना चित्रपटाच्या व दूरदर्शनच्या माध्यमातून ओळखतो एक सकस कलाकृती घेऊन त्या तुमच्या भेटीला २२ मार्चपासून येत आहेत.

'गणेश फिल्म्स' निर्मित आणि 'श्री. अधिकारी ब्रदर्स' प्रस्तुत 'जन्मऋण' चित्रपटाच्या लेखिका, निर्माती, दिग्दर्शक आहेत कांचन अधिकारी. या चित्रपटात मनोज जोशी, सुकन्या कुलकर्णी, सुशांत शेलार, तुषार आर.के., अनघा अतुल, शशी पेंडसे, प्रज्ञा करंदीकर, धनंजय मांद्रेकर, दर्पण जाधव, विराज जोशी, कपील पेंडसे, सिद्धेश शिगवण आणि पाहुणे कलाकार म्हणून खास भूमिकेत हिंदी मालिका-चित्रपट अभिनेते महेश ठाकूर, निहारिका रायजादा यांनी काम केले आहे.

डीओपी सुरेश देशमाने यांच्या कॅमेऱ्यातून जन्मऋणचे सौन्दर्य अधिकच खुलले असून संगीतकार वैशाली सामंत आणि गायक सुदेश भोसले, वैशाली सामंत यांच्या संगीत सुरावटीने ही कथा अधिक रंग भरते. येत्या २२ मार्चला तुमच्या जवळच्या चित्रपटगृहात जाऊन हा चित्रपट नक्की पहा व नवीन दृष्टिकोन मिळवा.

# अनुच्छेद ३३८ बी मध्ये दुरुस्ती म्हणजे नक्की काय? अभ्यासक राजेंद्र दाते पाटील

## केंद्र आणि राज्यसुची तरतुदी लक्षात घेणे गरजेचे !

मुंबई, दि. १९ (प्रतिनिधी) – (मुंबई) या पुर्वी झालेली घटना दुरुस्ती आणि सध्याचा एस इ बी सी कायदा २०२४ या मध्ये नेमका काय फरक आहे ? ही बाब समाजा समोर यावी म्हणून अनुच्छेद ३३८ बी मध्ये दुरुस्ती म्हणजे नक्की काय? हे अत्यंत सरळ आणि सोप्या भाषेत जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांनी आमच्या प्रतिनिधी सोबत विशेष बातचीत करतांना स्पष्ट केले आहे.

पुढे आमच्या विशेष प्रतिनिधी मुंबई समोर बोलताना त्यांनी अनेक घटनात्मक आणि कायदेशीर बाबीवर स्पष्टता केली असुन ते म्हणतात की,२०२१ साल च्या बील क्रमांक १२४ च्या पृष्ठ क्रमांक २ वरील २ प्रमाणे घटनेच्या कलम ३३८ ब मध्ये, खंड (९) मध्ये, खालील तरतूद समाविष्ट केली जाईल, म्हणजे:– 'परंतु, कलम ३४२अ च्या खंड (३) च्या हेतूंसाठी या खंडातील काहीही लागू होणार नाही.' असे नमुद असल्याची बाब जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांनी स्पष्ट करताना पुढें सांगितलें की,अनुच्छेद ३४२ अ मध्ये दुरुस्ती मधील अनुक्रमांक ३ नुसार संविधानाच्या अनुच्छेद ३४२ अ मध्ये,(अ) खंड (१) मध्ये, 'या राज्य घटनेच्या हेतूंसाठी करतील सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गीय' या शब्दांसाठी, ' केंद्रीय यादीतील सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या मागास वर्ग जे केंद्राच्या हेतूंसाठी करतील. सरकार' बदलले जाईल; तर पुढे (बी) खंड (२) नंतर, खालील समाविष्ट केले जातील, म्हणजे:– स्पष्टीकरण. खंड (१) आणि (२) च्या उद्देशांसाठी, 'केंद्रीय सूची' या अभिव्यक्तीचा अर्थ केंद्र सरकारने आणि त्यांच्यासाठी तयार केलेली आणि देखरेख केलेली सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या मागास वर्गांची यादी आहे. अनुक्रमांक (३) नुसार खंड (१) आणि (२) मध्ये काहीही असले तरी, प्रत्येक राज्य किंवा केंद्रशासित प्रदेश, कायद्या नुसार, त्यांच्या स्वत:च्या हेतूंसाठी, सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या वर्गांची यादी तयार करू शकतो आणि राखू शकतो, ज्यामध्ये नोंदी असू शकतात केंद्रीय यादी पेक्षा वेगळे.' अनुच्छेद ३६६ मध्ये दुरुस्ती बाबत बोलताना जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांनी स्पष्ट करताना पुढें सांगितलें की, याच पृष्ठातील अनुक्रमांक ४नुसार घटनेच्या कलम ३६६ मध्ये, खंड (२६ सी ) साठी, खालील कलम बदलले जाईल, म्हणजे: '(२६सी ) 'सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले वर्ग' म्हणजे असे मागासवर्गीय जे अनुच्छेद ३४२अ अंतर्गत केंद्र सरकारच्या किंवा राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशाच्या उद्देशाने, जसे की असेल तसे मानले गेले आहेत

'स्टेटमेंट ऑफ ऑब्जेक्टस अँड रिझन म्हणजे वस्तु आणि कारणांचे विधान या प्रमाणे ' संविधान (शंभर आणि दुसरी दुरुस्ती) कायदा,२०१८ मध्ये तीन समाविष्ट केले आहेत नवीन कलम, म्हणजे, ३४२अ, ३६६(२६सी) आणि ३३८बी संविधानात. तर कलम ३३८ बी.मध्ये आहे मागास वर्गीयांसाठी राष्ट्रीय आयोगाची स्थापना केली, कलम ३४२ अ सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गांची मध्यवर्ती यादी (सामान्यत: या नावाने ओळखली जाते इतर मागासवर्ग) आणि अनुच्छेद ३६६(२६ सी ) यांनी सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गीय परिभाषित केले आहे.

२. राज्यघटना संमत होण्याच्या वेळी कायदे मंडळाचा हेतू (एकशे आणि दुसरी दुरुस्ती) कायदा, २०१८ असा होता की तो सामाजिक आणि केंद्रीय यादीशी संबंधितआहे ,शैक्षणिक दृष्ट्या मागास वर्ग (एस इ बी सी च्या ).हे तथ्य ओळखते की घोषणा होण्या पूर्वीच १९९३ मधील एस इ बी सी च्या केंद्रीय यादी मध्ये, अनेक राज्ये/ केंद्र शासित प्रदेशांचे स्वतःचे राज्य आहे,ओबीसींची यादी/केंद्र शासित प्रदेश यादी.

संसदेत हेच स्पष्ट करण्यात आले की राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांची एस इ बी सी ची स्वतंत्र राज्य यादी/ केंद्रशासित प्रदेश यादी सुरू ठेवू शकते.अशा राज्य यादीमध्ये किंवा मागासवर्गीयांच्या केंद्रीय यादीमध्ये समाविष्ट असलेल्या जाती किंवा समुदाय एस इ बी सी च्या केंद्रीय यादीमध्ये समाविष्ट असलेल्या जाती किंवा समुदायां पेक्षा वेगळे. तर पुढे अनुक्रमांक ३ प्रमाणे असे नमुद आहे की, जरी,१९९३ पासून केंद्र सरकारच्या स्वतंत्र याद्या नेहमी अस्तित्वात होत्या आणि राज्य सरकारे आणि केंद्रशासित प्रदेशांचा, कायदा झाल्यानंतर प्रश्न निर्माण झाला आहे. संविधान (शंभर दुसरी दुरुस्ती) कायदा, २०१८ च्या एस इ बी सी च्या एकल केंद्रीय यादीसाठी राज्य घटनेतील दुरुस्ती अनिवार्य प्रत्येक राज्यासाठी एस इ बी सी, त्याद्वारे राज्याचे तयार करण्याचे आणि देखरेख करण्याचे अधिकार काढून घेतले जातात एस इ बी सी ची स्वतंत्र राज्य यादी असे नमुद असुन यातील अनुक्रमांक ४ नुसार राज्य सरकार आणि केंद्रशासित प्रदेशांना एस ई बी सी ची स्वतःची राज्य यादी/केंद्रशासित प्रदेश सूची तयार करण्याचा आणि देखरेख करण्याचा अधिकार आहे हे पुरेसे स्पष्ट करण्यासाठी आणि या देशाची संघराज्य संरचना कायम ठेवण्याच्या दृष्टीकोनातून, लेखात सुधारणा करणे आवश्यक आहे. ३४२अ आणि घटनेच्या कलम३३८बी आणि ३६६ मध्ये परिणामी सुधारणा करा. असे नमुद केलेले असुन पुढे अनुक्रमांक ५ नुसार विधेयक वरील उद्दिष्टे साध्य करण्याचा प्रयत्न करते असे स्पष्ट पणे ४ ऑगस्ट २०२१ रोजी वीरेंद्र कुमार यांनी स्वाक्षरीत केले आहे.

म्हणून पुढे बोलतांना जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांनी स्पष्ट करताना सांगितलें की, राज्य सुची आणि केंद्र सुची या वेगवेगळ्या बाबी असुन त्या समजुन घेतल्या शिवाय सदरची घटना दुरुस्ती लक्षात येणार नाही.

# बाबा रामदेव यांना सर्वोच्च झटका!

## सुनावणीवेळी हजर राहण्याचे दिले आदेश

नवी दिल्ली, दि. १९ (प्रतिनिधी) – योगगुरु रामदेव बाबा आणि त्यांची कंपनी पतंजलीला झटका बसला आहे. दिशाभूल करणाऱ्या जाहिरातीप्रकरण पतंजलीवर शेकण्याची चिन्हं आहेत. याप्रकरणात बाबा रामदेव यांना दिलासा मिळण्याची चिन्हं नाहीत.

पतंजलीचे आयुर्वेदीक उत्पादनं आणि उपचारासंबंधीच्या दाव्या संदर्भात जाहिरातीत जो काही दावा करण्यात आला आहे, त्याविरोधात अवमानाना कारवाई सुरु आहे. याप्रकरणात मंगळवारी सुप्रीम कोर्टात सुनावणी झाली असता योगगुरु रामदेव बाबा आणि कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक आचार्य बालकृष्ण यांना व्यक्तिशः हजर राहाण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले. ही वार्ता शेअर बाजारात येऊन धडकताच पंतजली फूड्सच्या शेअरमध्ये ३ टक्क्यांची घसरण दिसून आली.

### नेमकं प्रकरण काय

इंडियन मेडिकल असोसिएशनने (IMA) सर्वोच्च न्यायालयात एक याचिका दाखल केली आहे. त्यावर सुनावणीदरम्यान बाबा रामदेव यांच्यावर लसीकरण अभियान आणि आधुनिक औषधीविरोधात मोहिम छेडल्याचा आरोप लावण्यात आला आहे. न्या.हिमा कोहली



आणि न्य. अहसानुद्दीन अमानुल्लाह यांच्या खंडपीठाने कंपनी आणि बालकृष्ण यांच्याविरोधात यापूर्वी बजावलेल्या नोटीसला उत्तर न दिल्याने नाराजी व्यक्त केली. त्यांच्या या वृत्तीबद्दल त्यांच्याविरोधात अवमानना कारवाई का करण्यात येऊ नये, अशी विचारणा न्यायालयाने केली. कोर्टाने आज रामदेव बाबा यांना नोटीस बजावत, त्यांच्याविरोधात अवमान केल्याप्रकरणात कार्यवाही का करण्यात येऊ नये अशी विचारणा केली.

कोर्टाच्या आदेशानंतर पतंजली फुड्सच्या शेअरमध्ये मोठी घसरण दिसून आली. BSEच्या आकड्यांनुसार पतंजली फुड्सच्या शेअरमध्ये ३.१५ टक्के म्हणजे जवळपास ४४ रुपयांची घसरण दिसून आली.

घसरणीसह हा शेअर १३७२ रुपयांवर व्यापार करत आहे. तर व्यापारी सत्रात या शेअरने १३४२.०५ रुपयांचा निच्चांक पण गाठला. आज कंपनीच्या शेअरमध्ये किंचित घसरण होऊन तो १४१०.१० रुपयांवर उघडला होता. एका दिवसापूर्वी कंपनीचा शेअर १४१६.६० रुपयांवर बंद झाला होता. आकड्यांनुसार कंपनीचे मूल्यांकन ५० हजार कोटी रुपयांनी घसरले. प्रकरणात आता पुढे काय होते, याकडे गुंतवणूकदार आणि ब्रोकर्सचे लक्ष लागले आहे. त्यानुसार, या शेअरमध्ये चढउताराचे सत्र दिसून येऊ शकते.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक

लोकविजय

(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)

हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरुणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.

**: संपादक :**

**राजेंद्र पांडुरंग रांजणीकर**

मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५

e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.

(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# विकास आराखड्यात दस्तऐवजांचे बनावटीकरण, अकृषिक परवानगी

## प्रकाराची उच्चस्तरीय चौकशी करण्याची विभागीय आयुक्तांची मागणी

छत्रपती संभाजीनगर दि.१९ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगर क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात बनावट आदेश करुन मंजूर आराखड्यातील ना-विकास क्षेत्रामध्ये दिलेल्या दाखल्यात छेडछाड करुन व दस्तऐवजांचे बनावटीकरण करुन अकृषिक परवानगी देण्याचे प्रकार होत असल्याच्या अनेक तक्रारी येत आहेत. या गैरप्रकारामुळे शासनाची आर्थिक व नियोजनात्मक हानी होत आहे. याबाबत आपल्या स्तरावरुन उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर आवश्यक ती कार्यवाही तातडीने करावी, असे विभागीय आयुक्त मधुकर राजे अर्दड यांनी नगररचना विभागाच्या संचालकाला कळविले आहे.

औरंगाबाद महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कार्यालयामध्ये कार्यरत असणारे नगररचना विभागातील अधिकारी कर्मचारी यांनी उपरोक्त बाबींना आळा बसावा यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे, प्राप्त प्रकरणांची चौकशी करणे व संबंधितांवर गुन्हे दाखल करणे इत्यादी प्रकारची कार्यवाही करणे अपेक्षित आहे. स्वतःहून कोणत्याही प्रकारची कार्यवाही केली जात नसल्याने अथवा संबंधितांवर कार्यवाही प्रस्तावित केल्या जात नसल्याने मंजूर आराखड्यामध्ये फार मोठ्या प्रमाणात अनुचित फेरबदल होत असल्याने विकास आराखड्याचा मूळ उद्देश साध्य होणार नाही, अशी आपली धारणा असल्याचेही विभागीय आयुक्त श्री अर्दड यांनी संचालकांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे.

महानगराबाबतीत अत्यंत महत्त्वाचा विषय हा महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर रचना अधिनियम १९६६ शी निगडीत असल्याने व तांत्रिक स्वरुपाचा असल्याने तसेच वरील गैरप्रकारामुळे शासनाची खूप मोठ्या प्रमाणात आर्थिक व नियोजनात्मक हानी होत आहे. महानगराच्या नियोजनबध्द विकासाच्या उद्देशाला व त्या दृष्टीने केलेल्या नियोजनास प्रतिकूल ठरत असल्याची शक्यता व्यक्त करून याबाबत आपल्या स्तरावरुन उच्चस्तरीय चौकशी व्हावी तसेच त्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही तातडीने करावी, अशी विनंतीही श्री अर्दड यांनी नगर रचना विभागाच्या संचालकाला केली आहे.

# जागतिक किडनी दिनी अवयव दाता व विद्यार्थ्यांनी दिला पथनाट्याद्वारे अवयव दानाचा संदेश !

छत्रपती संभाजीनगर दि.१९ (प्रतिनिधी)- जागतिक किडनी दिवस निमित्त डॉ. हेडगेवार रुग्णालयात किडनी दाता सत्कार समारंभ व अवयवदान जनजागृती ही पथनाट्य द्वारे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथि डॉ. हेडगेवार रुग्णालायच्या मुख्य कार्यकरी अधिकारी डॉ. राजश्री रत्नपारखे तसेच मेडिसीन विभाग प्रमुख डॉ.सागर गुप्ता, डॉ.रंजना देशमुख, श्री.रामचंद्र इंस्टीट्यूट ऑफ मेडिकल सान्सेस चे डॉ.अनिल जोशी, प्रो-मेडिसीन, डॉ.कुलदीपसिंग राऊळ, प्रो-मेडिसीन व किडनी विभागाचे डॉ.नीरज इनामदार (किडनी विकार व किडनी प्रत्यारोपण तज्ञ ), डॉ.भाग्यश्री पाटील हे कार्यक्रमास उपस्थित होते.

सदर कार्यक्रमास डॉ.अनिल जोशी यांनी किडनी दाता यांना प्रत्यारोपना नंतर व डायलेसिस रुग्णांना झेडटीसीसी किडनी प्रतीक्षा यादीची विषयक व किडनीच्या कार्य विषयक मार्गदर्शन केले. डॉ. कुलदीपसिंग राऊळ यांनी बोलतानी किडनी आजार हा आजच्या धावपळीची परिस्थित लक्षात घेता आपण वेदनाशामक गोळ्याचा अति-सेवना मुळे तसेच उच्च रक्तदाब व इतर कारणांमुळे व बळावत या आजाराची तीव्रता कमी कशी करता येईल विषयक मार्गदर्शन केले.

डॉ. रंजना देशमुख–मधुमेह तज्ञ –किडनी प्रत्यारोपणा पूर्वी व नंतर अति-उच्च रक्तदाब / मधुमेह या पासून आज आपल्यातील सर्वांनी आपले जीवन क्रमात बदल केला पाहिजे. समाजातील प्रत्येकाने व किडनी प्रत्यारोपीत रुग्ण तसेच किडनी दाता यांनी ही या आजाराची लक्षणे लक्षांत घेता काळजी घेणे गरजेचे आहे असे बोलतानी सांगितले.

डॉ.नीरज इनामदार- डायलेसिस रुग्णांनी पाण्याच्या व मिठाचा वापर कमी करावे, तसचे वजन नियंत्रणात ठेवावे, तसेच किडनी प्रत्यारोपीत रुग्ण यांनी किडनी प्रत्यारोपना नंतर कसी काळजी घ्यावी याचे मार्गदर्शन केले. डायलेसिसी विभागाच्या दुसऱ्या वर्षाच्या मुला-मुलींनी पथनाट्यातून ब्रेन डेड नंतर व्यक्ति कोण कोणते अवयव दान करू शकतो याचे सादरीकरण केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल घोगरे अवयव प्रत्यारोपण समन्वयक व श्री. अशोक फटागडे यांनी केले.

# आचार्य देवनंदी महाराज यांचे २० मार्च रोजी राजाबाजार जैन मंदिर आगमन

छत्रपती संभाजीनगर दि.१९ (प्रतिनिधी)- कुंथुगिरी तीर्थ प्रनेता गणाधीपति गंनधराचार्य कुंथुसागरजी महाराज यांच्या उपवानातील सुगंधित पुष्प आचार्य राष्ट्रसंत सारस्वताचार्य देवनंदीजी महाराज यांचे दिनांक २० मार्च रोजी सकाळी ७:३०वाजता राजाबाजार जैन मंदिर आगमन होणार आहे हतनूर येथील वेदीप्रतिष्ठा संपन्न करून शहरातील वेदांत नगर जैन मंदिरात वास्तव्यास आहे सकाळी ते वेदांत नगर विहार करून कोकणवाडी चौक चिंतामणी कॉलनी निराला बाजार आंरगपूरा भाजीबाजार पानदरीबा किराणा चावडी मार्गाने राजाबाजार जैन मंदिरात आगमन होणार आहेत तरी समाज बांधवांच्या लाभ घ्यावा असे आव्हान पंचायत अध्यक्ष ललीत पाटनी सचिव अशोक अजमेरा यांच्यासह विश्वस्थ मंडळ व कार्यकारिणी केले आहेत

# विद्यार्थ्यांनी रॅली काढून मतदारांची केली जनजागृती

गंगापूर दि.१९ (प्रतिनिधी)- ११२ वैजापूर विधानसभा मतदार संघ सिध्दनाथ वाडगाव येथे मंगळवार बाजारच्या दिवसाचे औचित्य लक्षात घेऊन प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक तथा बी एल ओ सुनील जाधव, सुनील वाघमारे, प्रशांत गांगुर्डे यांनी मतदार जनजागृती रॅली काढून ठिकठिकाणी थांबून नागरिकांना मतदार नोंदणी करणे व तेरा में रोजी होणाऱ्या लोकसभेच्या मतदानासाठी शंभर टक्के मतदानाचा आकडा गाठण्यासाठी प्रयत्न करावेत याची माहिती देण्यात आली.

# जायंटस् ग्रुप ऑफ छत्रपती संभाजीनगर आणि प्रादेशिक परिवहन कार्यालय यांचे रस्त्यावर सुरक्षीत चालणाऱ्या उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद

छत्रपती संभाजीनगर दि.१९ (प्रतिनिधी)- जायंटस् ग्रुप ऑफ छ. संभाजीनगर चे वॉक राईट चे प्रकल्प प्रमुख देवेन्द्र सेठ कळवितात की, जायंटस् ग्रुप ऑफ छ. संभाजीनगर ही संस्था जायंटस वेलफेअर फाऊंडेशन अंतर्गत कार्यरत असलेली मुख्य संस्था आहे. नुकतेच जायंटस् ग्रुप ऑफ छ. संभाजीनगर यांनी प्रादेशिक परिवहन कार्यालया सोबत रस्त्यावर सुरक्षित कसे चालावे व परिवहन नियमन हा प्रकल्प राबविला त्याची माहिती देण्यासाठी आज पत्रकार परिषद आयोजित केली आहे. या पत्रकार परिषदेत प्रादेशिक वाहन कार्यालयातर्फे ओ.आर.टी.ओ. सौ सविता पवार आवर्जून उपस्थित आहेत.

वेलफेअर फाऊंडेशन ही खऱ्या अर्थाने पूर्णतः भारतीय सेवाभावी संस्था असून आमचे गुपचे जगभरात ७०० हून अधिक गट (ग्रुप) सामाजिक कार्यात कार्यरत असून, ग्रुपचे २७००० हून अधिक सदस्य सक्रीय आहेत, शायना एन. सी. (चुडासामा) ही आमची वर्ल्डचेअर पर्सन आहे.

आमच्या ग्रुपचे विविध सामाजिक उपक्रम आम्ही वर्षभर राबवतो. त्याच्या अंतर्गत प्रामुख्याने काही नावाजलेले प्रकल्प जसे मोफत जयपूर फूट वाटप, पर्यावरणासाठी दुर्मिळ वृक्षाचे रोपण आणि संगोपन, फुटकळ भाजी व फळ विक्रेत्यांस उन्हापासून बचावासाठी छत्री वाटप इत्यादी आहे.

जागतिक बँकेच्या ताज्या पाहणीनुसार भारतामध्ये जगातील एकंदरीत वाहनाच्या तुलनेने १३ वाहन असून अपघाताची तुलना जागतिक स्तरावर केली तर अपघाताचा भारताचा वाटा ११३ आहे. भारताच्या वाहनाच्या मार्केट मध्ये प्रवासी वाहने आणि दुचाकी वाहनाचे वर्चस्व असून अस्थायी १२ कुटुंबापैकी फक्त १ कुटुंबाकडे कार आहे. आमचा संपूर्ण हेतू लोकांना शिकण्यास व प्रशिक्षीत करण्याचा आहे. आमचे ध्येय, माहिती प्रसारीत करणे नसून तो विद्यार्थी आणि जनतेमध्ये परिवर्तन आणणे आहे. त्यासाठी आम्ही १९००० च्या वर पत्रके विविध शाळेतील विद्यार्थ्यांना वितरीत केली. विद्यार्थ्यांनी प्रत्येकी ३८ लोकांना भेटून त्यांना दिलेले पत्रके दाखवून रोडवर कसे "थ्र्ढ'घ्ठ्प्ऊ आणि परिवहन नियमन बद्दल शिक्षीत करणे हा आहे आणि हा उपक्रम ज्या विद्यार्थ्यांनी केला त्यास प्रोत्साहनपर आम्ही भेटवस्तू ही दिली आहे.

ह्या सर्व विद्यार्थ्यांना आम्ही ब्रॅन्ड ॲम्बॅसिटर बनवून छ. संभाजीनगर च्या लाखो जनतेपर्यंत आम्ही शिक्षित करण्याचा प्रयत्न केला. आम्हास असे वाटते प्रसार माध्यमाने जसे वर्तमान पत्र, टी. व्ही, न्यूज, विविध साहित्यीक यांनी सुध्दा त्याचा प्रसार आणि प्रचार आपल्या माध्यमाने करावा व "थ्र्ढ'घ्ठ्प्ऊ आणि परिवहन नियमन जनतेपर्यंत पोहचवावे.

रस्त्यावर चालतांना आमची लोकांना कळकळीची विनंती आहे की, उजव्या बाजूने चालावे त्यामुळे वाहनाचा वेग, गाडी चालकाचा गाडीवरचा चुकलेला ताबा वगैरे लक्षात येवून अपघातापासून आपण बचाव करु



शकतात. आमच्या जायंटस ग्रुपच्या माजी अध्यक्षा आणि ज्ञानेश विद्या मंदीराच्या संस्थापिका सौ पुजाजी विठोरे ह्याच्या कारकिर्दीमध्ये पूर्ण झाला व नुतन अध्यक्षा सौ सुवर्णा जोशी ह्यांनी सर्व कार्यक्रमात आवर्जून उपस्थित होत्या. त्यासोबत आमचे युनीट २-बी चे अध्यक्ष श्री गुरुदत्त राजपूत, सचिव रामनारायण बंग, कोषाध्यक्ष विष्णू राऊत, उपाध्यक्ष एक्सटर्नल नरेंद्र पटेल, माजी अध्यक्ष शैलेंद्र विठोरे, कार्यकारी सदस्य शंकरभाई पटेल, जिवराज पटेल, दिपाबेन पटेल, सुभाष नायक, शिवनाथ राठी वेळोवेळी हजर राहून सहकार्य केले बद्दल आभारी आहोत.

यासोबत आम्ही खूपखूप आभारी आहोत प्रादेशिक कार्यालयाचे अधिकारी ए.आर.टी.ओ. सौ सविता पवार, अमीत लखपती, प्रसाद वानखेडे, रुपाली तुर्कणे, पुनम साठे, आशिष खंडागळे, माहेश्वरी चव्हाण, योगीता पांडव आणि अश्विनी कुमावत ह्यांनी सकाळी ६.३० वाजता विविध शाळेत येवून विद्यार्थ्यांना आरटीओ परिवहन नियमन आणि रस्त्यावर चालतांना घ्यावयाची सुरक्षितता सरळ सोप्या भाषेत विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

(पान १ वरुन)

## सीएएला स्थगिती देण्यास सर्वोच्च न्यायालयाचा नकार

मुदत देण्याच्या निर्णयाचा विरोध केला. सिब्बल म्हणाले, सीएए पारित होऊन चार वर्षे झाली आहेत. चार वर्षांत त्यांनी (केंद्र सरकार) अशी माहिती गोळा करून ठेवायला हवी होती. तसेच आता लोकांना नागरिकत्व बहाल केलं गेलं तर नंतर ते नागरिकत्व काढून घेणं अवघड होईल. तसं झाल्यास या सर्व याचिका कुचकामी ठरतील. चार वर्षांनंतर केंद्राला अशी कुठली घाई होती की अचानक त्यांनी यासंबंधीची अधिसूचना काढली? त्यामुळे न्यायालयाने या अधिसूचनेवर स्थगिती द्यावी.

## मोदीसारखी आमची जुमलेबाजी व फेकूगिरी नाही,....

काँग्रेसप्रणित युपीए सरकारच्या राष्ट्रपतीपदाच्या उमेदवार प्रतिभाताई पाटील व प्रणव मुखर्जी यांना पाठिंबा दिला होता, याची माहिती कदाचित या लोकांना नसावी किंवा त्यांना विसरण्याचा रोग जडला असावा त्यामुळे या मंडळींनी उगाच बोंबाबोंब करु नये. शिवाजी पार्कवरील सभेला गर्दी नव्हती, हास्यजत्रा होती अशी बाष्कळ बडबड करणाऱ्या चंद्रशेखर बावनकुळे यांनी सभेची गर्दी पाहण्यासाठी मोठ्या भिंगाचा चष्मा वापरुन पहावे. मोदींच्या सभेला भाडोत्री गर्दी कशी जमावावी लागली, हे यवतमाळच्या सभेने अख्या महाराष्ट्रानेही पाहिले आहे. चंद्रशेखर बावनकुळे हेच एक 'विनोदीपात्र' आहेत आणि भाजपात बावनकुळेंची काय किंमत आहे, हे विधानसभा निवडणुकीत त्यांना उमेदवारी देण्यावरून दिसले आहे. ज्या पक्षाच्या प्रदेशाध्यक्षाला उमेदवारीही मिळत नाही, यावरुन पक्षातील त्यांची किंमत काय, हे कळते.

## अजित पवार विरुद्ध शरद पवार याचिकेत दोघांना दिलासा

अजित पवार गटाच्या विरुद्ध शरद पवार गटाने दाखल केलेल्या याचिकेवर १४ मार्च रोजी सुनावणी झाली होती. अजित पवार यांचा गट शरद पवार यांचा फोटो वापरत असल्याचे शरद पवार गटाच्या वतीने न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले होते. यावर सर्वोच्च न्यायालयाने अजित पवार गटाला चांगलेच फटकारले होते. तसेच आम्ही शरद पवार यांचा फोटो वापरणार नाही, असे शपथपत्र देण्याचे निर्देश देखील अजित पवार गटाला दिले होते. तसे शपथपत्र शनिवारी म्हणजेच १६ मार्च रोजी अजित पवार गटाने सर्वोच्च न्यायालयात सादर केले आहे. मात्र, गेल्या सुनावणी दरम्यान न्यायालयाने घड्याळ हे निवडणूक चिन्ह बदलून दुसरे चिन्ह का वापरत नाही? असा तोंडी प्रश्न अजित पवार गटाला विचारला होता. त्यावेळी न्यायालयाने या संदर्भात कोणतेही निर्देश दिले नव्हते. तसेच शरद पवार यांचे तुतारी वाजवणारा माणूस हे निवडणूक चिन्ह केवळ राज्यसभा निवडणुकीपुरते देण्यात आल्याचा दावा अजित पवार गटाने केला होता. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने या दोन्ही गटाचे निवडणूक चिन्ह सध्यातरी कायम ठेवले आहे.

## येत्या ८ दिवसांत अंबादास दानवे स्फोट घडवणार:....

उद्धव ठाकरे यांच्या हातात सोपवली होती, मात्र, तीच शिवसेना संपवण्याचे काम उद्धव ठाकरेंनी केले. काल मी मुंबईत असतांना एक म्हतारी मला भेटली आणि मी शिंदेंच्या शिवसेनेत असल्याचे महित झाल्याने तिने माझी पाठ थोपटली. त्यामुळे उद्धव ठाकरेंनी शिवसेनेचा सत्यानाश करून टाकला. यामुळे अक्षरशः वेदना होतात, अशा भावना बांगर यांनी व्यक्त केल्या.

## एन्काउंटर स्पेशालिस्ट प्रदीप शर्मांना जन्मठेप

बनावट चकमक असल्याचा आरोप करत लखन भैयाच्या भावाने याच्या विरोधात न्यायालयात धाव घेतली होती. ज्या २०१३ मध्ये मुंबईतील सत्र न्यायालयाने या प्रकरणात १३ पोलिसांसह २१ जणांना दोषी ठरवले आणि सर्व दोषींना जन्मठेपेची शिक्षा सुनावली. या प्रकरणात न्यायालयाने प्रदीप शर्मा यांची निर्दोष मुक्तता केली होती. न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे आणि न्यायमूर्ती गौरी गोडसे यांच्या खंडपीठासमोर चकमक प्रकरणातील दोषींनी दाखल केलेल्या अपीलांवर सुनावणी सुरू होती.

## आमदार राजन साळवी यांच्या पुतण्याची एसीबीकडून...

त्यामुळे त्यांच्यासह त्यांची पत्नी आणि मुलगा यांच्या विरुद्ध गुन्हे दाखल झाले आहेत. मंगळवारी त्यांचे पुतणे दुर्गेश साळवी यांना मालमत्ता संदर्भातील चौकशीसाठी बोलावण्यात आले होते असे एसीबीच्या वतीने सांगण्यात आले. सुमारे पाच तास चौकशी करण्यात आली.

# मुलींसाठी स्वच्छतागृह नाहीत, पाढे येत नाही, ना गणित

## जि.प.सीईओ विकास मीणा यांनी केलेल्या शाळा भेटीत भयानक वास्तव उघड

छत्रपती संभाजीनगर दि.१९ (प्रतिनिधी)- एकीकडे 'जि.प. शाळांचा विकास होत आहे, आम्ही प्रचंड मेहनत करतोय' असा आव आणण्याचे काम शिक्षकांकडून सुरू असतो. मात्र जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक विकास मीणा यांनी शाळेत अचानक भेट दिली असता एका शाळेत चौथीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना १९ पर्यंतचे पाढे पाठ तर दुसऱ्या शाळेत पाचवीच्या विद्यार्थ्यांना १४ पर्यंतचे पाढे कसेबसे पाठ झाल्याचे दिसून आले. दुसरीकडे भयानक गोष्ट पाहायला मिळाली की, काही शाळांमध्ये मुलींसाठी स्वच्छतागृहच नाही, एका शाळेत शिक्षक नाही असे वास्तव चित्र मंगळवारी जिल्हा परिषद प्रशासक मीणा यांना पिसादेवी, आडगाव सरक व पाबळ तांड्यातील शाळांमध्ये पाहावयास मिळाले. यावेळी मीणा यांनी मुलांचा तासही घेतला.

शिक्षण आणि आरोग्य या दोन विभागांबाबत अधिक जागरुक असलेले प्रशासक जिल्हा परिषदेंतर्गत सर्व सुविधा चांगल्या असाव्यात. यासाठी सुरवातीपासून आग्रही आहेत. आतापर्यंत जेंव्हा जेंव्हा त्यांनी गावभेटीसाठी गेले की शाळेत आवार्जून जातात. असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागली आहे. ग्रामीण भागातील मतदार केंद्रांचा आढावा घेऊन तेथे सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने काय उपाययोजना कराव्या लागतील. याच्या पाहणीसाठी प्रशासक पाहणी करत आहेत. मंगळवारी सकाळी मीणा यांनी छत्रपती संभाजीनगरमधील त्यांनी पिसादेवी, आडगाव सरक आणि पाबळ तांडा येथील जिल्हा परिषद शाळांना भेट दिली.

भेटीदरम्यान त्यांनी विद्यार्थ्यांना शिकवले आणि चर्चाही केली. एका शाळेतील विद्यार्थ्यांना गणित व इंग्रजी विषयाची मोठी अडचण असल्याचे त्यांना दिसून आले. दोन्ही विषयांचा अभ्यास खराब होता. विद्यार्थ्यांना गुणाकार, भागाकार विचारले तर अनेकांकडून योग्य उत्तरे मिळाली नाहीत. त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विद्यार्थी खूप चांगले आहेत. त्यांना हसत खेळत योग्य पद्धतीने शिकवण्याची आवश्यकता असल्याचे मीणा म्हणाले.

एका शाळेत एक शिक्षक हजर नव्हते. काही निमित्ताने गटशिक्षणाधिकारी कार्यालयात गेल्याचे सांगण्यात आले. आडगाव सरकच्या शाळेत मुलींसाठी स्वच्छतागृहच नसल्याचे मीणा यांना निदर्शनास आले. स्वच्छतागृहाची व्यवस्था त्वरित करावी, असे आदेश त्यांनी ग्राम पंचायत ला दिले. सर्व ठिकाणची स्वच्छतागृहे स्वच्छ करण्याचेही त्यांनी आदेश दिले . दरम्यान विद्यार्थ्यांशी झालेल्या चर्चेनंतर गुणवत्तावाढीसाठी अपेक्षित प्रयत्न का गेले नाहीत असे शिक्षणाधिकारी यांना काळावल्याचे मीना यांनी माध्यम प्रतिनिधींशी बोलताना सांगितले.

# वंचित काँग्रेसला ७ जागांवर पाठिंबा देणार; प्रकाश आंबेडकर यांचा काँग्रेसपुढे प्रस्ताव

मुंबई दि.१९ (प्रतिनिधी)- लोकसभा निवडणूक अवघ्या काही दिवसांवर आली असताना महाविकास आघाडीतील जागावाटपाचा मुद्दा अद्याप सुटला नाही. त्यातच वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी काँग्रेसला अवघ्या ७ जागांवर पाठिंबा देण्याचा प्रस्ताव ठेवून एकच हल्लकल्लोळ उडवून दिला आहे. आंबेडकरांच्या या भूमिकेमुळे विरोधकांच्या आघाडीत बिघाडी होण्याचा धोका वाढला आहे.

प्रकाश आंबेडकर यांनी मंगळवारी काँग्रेस अध्यक्ष मुल्लिकार्जुन खरगे यांना एक पत्र लिहिले. या पत्राद्वारे त्यांनी आगामी लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला महाराष्ट्रातील ७ जागांवर पूर्ण पाठिंबा देण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. विशेषतः त्यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार या २ पक्षांवर आपली भूमिका न ऐकण्याचाही आरोप केला आहे.

प्रकाश आंबेडकर यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे की, १७ मार्च रोजी मुंबईतील भारत जोडो न्याय यात्रेच्या समापन महासमारंभात तुम्हाला व राहुल गांधी यांना भेटून आनंद झाला. आपण विस्तृत संभाषण करू शकलो नाही आणि म्हणूनच आज मी तुम्हाला पत्र लिहित आहे. आता लोकसभा निवडणुकीचे वेळापत्रक जाहीर झाले आहे. पण त्यानंतरही महाविकास आघाडी वंचित बहुजन आघाडीला कोणत्याही चर्चेसाठी किंवा बैठकीसाठी निमंत्रित न करता सातत्याने बैठका घेत आहे.

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) व राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) यांनी महाविकास आघाडीच्या झालेल्या अनेक बैठकीत वंचित बहुजन आघाडीच्या प्रतिनिधींचे म्हणणे ऐकून घेण्यास नकार दिला आहे. महाविकास आघाडीने वंचित बहुजन आघाडीला दिलेल्या या असमान वागणुकीमुळे आमचा या दोन्ही पक्षांवरचा विश्वास उडाला आहे, असे प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे.

# नशेत पेट्रोल संपले की चोरीची गाडी पार्किंग मध्ये सोडून पसार, दुचाकीचोराकडून १२ दुचाकी जप्त

छत्रपती संभाजीनगर दि.१९ (प्रतिनिधी)- चोरीची दुचाकी पेट्रोल संपेपर्यंत चालवायची नंतर एखाद्या पार्कींग मध्ये सोडून पसार व्हायचे नंतर बनावट चाबीने आणखी दुचाकी चोरी कडून चालवायची अशा १२ दुचाकी या चोरा कडून जप्त करण्यात बेगमपुरा पोलिसांना यश आले आहे. अशी माहिती पत्रकार परिषदेत डिसिपि नितीन बगाटे यांनी दिली आहे.

या दुचाकी चोराचे नाव आहे अंबर उर्फ बाळू विठ्ठल देवकर, वय २६, राहणार फरशीफाटा, तालुका फुलंब्री, नशेमध्ये हा दुचाकी चोरी करत असे. त्याला घाटी रुग्णालयाच्या पार्कींग मधून मोटारसायकलला चावी लावून संशयित रित्या हॅण्डल लॉक उघडण्याचा प्रयत्न करत शिताफीने ताब्यात घेतले. विश्वासात घेऊन विचारले असता गांजाच्या नशेत मौजमजेसाठी पोलिस स्टेशन बेगमपुरा, एमआयडीसी वाळूज, सातारा, वेदांतनगर, एमआयडीसी सिडको, खुलताबाद, फुलंब्री भागातून दुचाकी चोरीचे गुन्हे केल्याची कबुली दिली. आतापर्यंत विविध पोलिस ठाण्यात १९ गुन्हे दाखल आहेत. १२ दुचाकी पोलिसांनी जप्त केले आहे. यामध्ये जास्त दुचाकी होंडा शाईन कंपनीचे आहे. एकूण ६ लाख ३० हजार रुपयांचे दुचाकी हस्तगत केली आहे. अशी माहिती बगाटे यांनी दिली आहे. नागरीकांनी आपल्या दुचाकी चांगले प्रकारचे लॉक लाऊन चोरी होणार नाही याची स्वतः काळजी घ्यावी. असे आवाहन केले आहे.